
# चिमूटभर मीठ देशभर आग



BVBK-0402079

श्रीपाद केळकर

वाचनालय शाखा.
२०७९
१४।४।८८

[illegible], वाचनालय शाखा.
[illegible]
दा. क्र. २०७९ दि. १४।४।८८
विषय वाचा क्र..........

प्रकाशक :

गोपाळ मोकाशी
सचिव, रचना समवाय
द्वारा अक्षर भांडार
९६८ सदाशिव पेठ,
उंबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रस्ता
पुणे ४११ ०३०.

*

प्रथमावृत्ती : १९८७

*

मुद्रक :


सु. स. जगताप
जनसेवा मुद्रणालय,
१९२, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

*

© प्रकाशकाधीन

*

स्वातंत्र्य कथा माला – १




विषय बा.वा.

# दांडी यात्रा : ठिणगी पडली !

२६ जानेवारी, १९३०. रविवार.

त्या दिवशी आपल्या देशात स्वातंत्र्याचा संदेश देत सूर्य उगवला. महात्मा गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष पं. जवाहरलाल यांनी ३१ डिसेंबर, १९२९ ला रात्री १२ वाजता लाहोर काँग्रेस अधिवेशनात भारतीय जनतेला आवाहन केले होते, २६ जानेवारीला सूर्याला साक्षी ठेवून संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घ्या.

तरुणांचे लाडके नेते पं जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली लाहोरला डिसेंबर, १९२९ मध्ये काँग्रेसचे प्रचंड अधिवेशन झाले. त्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्यात आली. या मागणीच्या पूर्तीसाठी कायदेभंग लढ्याला सिद्ध राहा, असे देशाला आवाहन करण्यात आले होते आणि महात्मा गांधींना लढ्याचे नेतृत्व करण्याची विनंती करण्यात



बाल
क्र. २०७८ दि. ११/१०/८५
विषय वाचा. क्र.

# दांडी यात्रा : ठिणगी पडली !

२६ जानेवारी, १९३०. रविवार.

त्या दिवशी आपल्या देशात स्वातंत्र्याचा संदेश देत सूर्य उगवला. महात्मा गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष पं. जवाहरलाल यांनी ३१ डिसेंबर, १९२९ ला रात्री १२ वाजता लाहोर काँग्रेस अधिवेशनात भारतीय जनतेला आवाहन केले होते, २६ जानेवारीला सूर्याला साक्षी ठेवून संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घ्या.

तरुणांचे लाडके नेते पं जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली लाहोरला डिसेंबर, १९२९ मध्ये काँग्रेसचे प्रचंड अधिवेशन झाले. त्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्यात आली. या मागणीच्या पूर्तीसाठी कायदेभंग लढ्याला सिद्ध राहा, असे देशाला आवाहन करण्यात आले होते आणि महात्मा गांधींना लढ्याचे नेतृत्व करण्याची विनंती करण्यात

आली होती.

मुंबईची चौपाटी. रेतीचे विस्तीर्ण मैदान असलेला समुद्र किनारा. पहाटेचे पाच वाजलेले होते. गाड्या भरभरून शेकडो काळे पोलीस शिपाई, गोरे ब्रिटिश सोजीर, सार्जंट्स व वडे अधिकारी चौपाटीवर पोचले. मैदानापासून थोडे दूर, एका बाजूला शिपाई व गोरे सोजिर रांगा धरून उभे राहिले.

दिवस वर येऊ लागला. स्त्री–पुरुषांचे, लहान–थोरांचे थवेच्या थवे एकामागून एक जमू लागले. सात-साडेसात वाजे-पर्यंत शुभ्र गांधी टोप्या पृष्ठभागावर तरंगत असलेला जनसागर दिसू लागला.

मैदानावर ध्वजस्तंभ उंच उभा होता. त्याभोवती गण-वेशधारी स्वयंसेवकांनी उपस्थित हजारोंना असंख्य गोलाकार रांगांत शिस्तीने उभे केले.

७–५५ वाजले. शेकडो केशरी साडीधारी महिलांतून एक तरुण महिला ध्वजस्तंभाखाली येऊन उभी राहिली. त्या होत्या कमलादेवी चट्टोपाध्याय. काँग्रेसच्या युवा नेत्या.

बिगुल वाजला. उपस्थित जनसमूह एकदम शांत, गंभीर झाला.

स्वयंसेवक पथकाचा कप्तान ध्वजस्तंभाच्या दुसऱ्या बाजूस उभा होता. बरोबर आठ वाजले. कप्तानाने हुकुम दिला, 'होश्यार.'

कमलादेवींनी स्वातंत्र्याचा तिरंगा फडकावला.

पुन्हा हुकुम झाला, 'प्रणाम.'

हजारो हात सलामीसाठी वर उंचावले आणि 'हाथ

नीचे' हुकुमासरशी परत खाली आले.

'आराम.'

दोन पायात अंतर ठेवून लोक शांतपणे उभे राहिले. त्यांचे लक्ष आता कमलादेवींवर केंद्रित झाले होते.

धीरगंभीर आवाजात कमलादेवी बोलू लागल्या, 'भाईयों और बहनो, आज इस पवित्र दिवसपर इस झण्डेके नीचे हम प्रण करते है, कि स्वाधीनता प्राप्त करनेमें ही हमारे जीवनका कोई अर्थ है...'

भाषण संपले.

पुन्हा आज्ञा झाली, 'होश्यार.'

दोन्ही पावले एकमेकांना जोडून लोक 'होश्यार' मध्ये उभे राहिले. आता तर वातावरणात अधिकच गांभीर्य व शांतता पसरली.

'महात्मा गांधी व जवाहरलाल के आदेशपर अव हमको यह शपथ लेनी है...' कमलादेवी उंच, गंभीर आवाजात शपथ सावकाश वाचू लागल्या,

'स्वतंत्रता हम हिंदुस्तानीयोंका हक है। इसको कोई भी छीन नही सकता ।

'जिस सत्ताने हमें चौतरफा वरबाद किया है उसको मानना हम मानवता व ईश्वर के प्रति अपराध मानते है । जो सरकार स्वाधीनता के हमारे अधिकारको छीनना चाहती है और हमारा दमन करती है उसको बदलना या समाप्त करना हम अपना कर्तव्य समझते है। हम मानते है कि हिंसा स्वाधीनताप्राप्तीका प्रभावी मार्ग नहीं है । इसलिए हम

जहाँतक संभव हो सके सरकारसे हमारा स्वेच्छया सहयोग वापस लेंगे और करबंदीसहित सभी तरहके सिविल नाफरमानीके लिये तैयार रहेंगे...'

'भारत माता की जय', 'महात्मा गांधी की जय', 'हम रहेंगे, रहेंगे, आजाद होकर रहेंगे' इत्यादी गगनभेदी घोषणांनी उपस्थितांनी शपथ घेतली.

इतक्यात जालंदरच्या श्रीमती शन्नोदेवी ध्वजस्तंभापाशी आल्या आणि उंच आवाजात गाऊ लागल्या,

'भारत न रह सकेगा हर्गिज गुलामखाना
होगा आजाद होगा आया है वह जमाना।
'परवा अब किसे है जेल और दमनकी
एक खेल हो रहा है फांसीपर झूल जाना'।


पुन्हा घोषणा देत ध्वजवंदनासाठी जमलेला समुदाय शांतपणे निघून गेला.

बंदोबस्तासाठी लाठ्या व संगिनी सरसावून उभ्या असलेल्या पोलिसांना आणि गोऱ्या अंमलदारांना वाटले, अरे येथे तर काहीच गडवड झाली नाही.

गडवड होणारच नव्हती. काँग्रेसचा व गांधीजींचा आदेश होता, २६ जानेवारीला नुसती शपथ घ्यायची. निदर्शने करायची नाहीत, कायदा मोडायचा नाही. सर्वत्र शांतता राहिली पाहिजे.

आणि झाले तसेच. देशभर नगरानगरांत, खेड्याखेड्यांत तिरंग्या झेंड्याखाली जमून लाखो लोकांनी शांतपणे संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घेतली. झेंडावंदने झाली, मिरवणुका निघाल्या,

जाहीर सभा झाल्या. घराघरांवर, चौकाचौकांत त्या दिवशी तिरंगा फडकत होता.



गांधीजी खूप खूष झाले. म्हणाले, ' माझ्या अपेक्षापेक्षाही माझ्या देशबांधवांनी जास्त साथ दिली आहे. स्वातंत्र्यलढ्याला आता अनुकूल वेळ आली आहे.'

गांधीजींनी देशाची नाडी ओळखली. त्यांच्याइतकी भारतीय जनतेची नस ओळखणारा दुसरा नेता देशात नव्हता.

देश लढ्याला सिद्ध होता.

आणि सरकारही सिद्ध होते.

लाहोरला काँग्रेस अधिवेशनात हजारो कंठांतून संपूर्ण स्वातंत्र्याचा घोष झाला. २६ जानेवारीच्या स्वातंत्र्यदिनाला प्रचंड जाहीर सभांतून देशातील कोट्यावधि जनतेने पुन्हा तोच घोष साऱ्या दुनियेला ऐक जाईल एवढ्या उंच आवाजात केला.

पण ब्रिटिश सरकारने जणू वहिऱ्याचे सोंग घेतले होते आणि ते साबरमतीच्या संताशी सामना करायला सिद्ध झाले होते.

हिंदुस्थानचे व्हाइसरॉय आयर्विननी धमकी दिली, 'देशांत कायद्याचे पालन व्हावे व शांतता राहावी, यासाठी जरूर ते सर्व उपाय करण्यास मी कचरणार नाही.'

गांधीजींनी व्हाइसरॉयना नम्रपणे उत्तर दिले, 'अशी धमकी अनावश्यक व निरर्थक आहे . . . पोकळ शांतता आम्हाला नको आहे . .'

दडपशाहीचा पहिला घाव सुभाषबाबूवर पडला. 'काँग्रेसने प्रतिसरकार स्थापन करावे. त्यामागे तरुणांची आणि किसान-कामगारांची शक्ती उभी करावी', अशी सुभाषबाबूंनी घोषणा केली होती. त्यांची ही घोषणा सरकारला भयंकर स्फोटक वाटली. लाख्खो तरुणांबरोबर २६ जानेवारीला सुभाषबाबू स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घेणार होते. तरुणांच्या या जहाल नेत्याला सरकारने त्याआधीच तुरुंगांत पाठविले.

लढा अटळ आहे, गांधीजींची खात्री झाली. त्यांनी व्हाइसरॉयना पत्र पाठविले. सत्याग्रही तंत्राप्रमाणे त्यांनी तडजोडीची तयारी दाखविली. त्यासाठी ११ मागण्या मांडल्या. जमिनीवरील

कर निम्मा करा, मीठावरील कर रद्द करा, विदेशी कापडावर जकात बसवा, लष्करावरील खर्चात पन्नास टक्के कपात करा, सरकारी अधिकाऱ्यांचे पगार निम्म्याने घटवा, संपूर्ण दारूबंदी करा इत्यादी.

जवाहरलाल आणि कित्येक लोक म्हणाले, 'यात स्वातंत्र्याची मागणी कुठे आहे ?'

परंतु व्हाइसरॉयना या मागण्यांतील खुबी बरोबर कळली. मागण्या दिसायला साध्या, पण त्या पुढे करून हा चतुर म्हातारा, आपणाला हिंदुस्तानातले आपले बिऱ्हाड गुंडाळायला सांगतो आहे.

अर्थात व्हाइसरॉयने गांधीजींच्या मागण्यांची दखल घेतली नाही.

आता तर लढा निश्चितच केला पाहिजे. १४–१५ फेब्रुवारीला काँग्रेस कार्यकारिणी गांधीजींच्या साबरमती सत्याग्रह आश्रमांत जमली. देशभर कायदेभंग आंदोलन सुरू करण्याचा ठराव झाला. गांधीजींना सेनापतिपद देण्यात आले. त्यांनी ठरवायचे कधी आंदोलन सुरू करायचे, कसे सुरू करायचे.

गांधी विचारात पडले. कोणता कायदा मोडून जनतेला आंदोलन करायला सांगायचे ? प्रश्न अवघड होता. हे तर अन्याय्य कायद्यांचे राज्य आहे. सर्वच कायदे जुलमी व अन्यायाचे.

गांधीजींना काही सुचत नव्हते. राष्ट्रकवि रवींद्रनाथ टागोरांनी त्यांना विचारले, 'काय ठरले ?'

गांधीजींनी त्यांना उत्तर दिले, 'मी रात्रंदिवस पिसाटा-

सारखा विचार करतो आहे. परंतु भोवतीच्या अंधारातून कुठेही प्रकाशाचा किरण दिसत नाही.'

आणि अकस्मात एक दिवस त्यांना प्रकाशाचा किरण दिसला. मिठाचा कायदा मोडायचा.

मीठ. गरीबांपासून श्रीमंतापर्यंत सर्वांच्या अन्नाला गोडी देणारे खारट मीठ हवा आणि पाण्याप्रमाणे निसर्गाने दिलेली देणगी. हिंदुस्तानची सत्ता मिळताच इंग्रजांनी मिठावर कर लादला. का ? तर देशी मीठ महाग व्हावे आणि इंग्लंडमधील मीठ भारतात खपावे म्हणून. हा अन्याय आहे.

गांधीजींना कदाचित् आठवण झाली असेल, ५७ च्या बंडाअगोदर कितीतरी वर्षे गुजरातमधील जनतेने मीठ करा-विरुद्ध बंड उभारले होते.

काँग्रेस कार्यकारिणी पुन्हा १ मार्चला साबरमती आश्र-मात जमली. गांधीजींनी आपली कल्पना सांगितली. मीठ तयार करायचे आणि ते सरकारी कर न देता वाटायचे किंवा विका-यचे. हा महात्मा काय सांगतोय हे सभासदांच्या लक्षातच येईना. ते म्हणाले, ' मीठ ? म्हणजे आम्ही फक्त मीठ तयार करायचे ?'

त्याने काय होणार ? एवढ्या बलिष्ठ सत्तेच्या सिंहा-सनावरची माशीसुद्धा असल्या कायदेभंगाने हालायची नाही.

११ मागण्या व्हाईसरॉयने ठोकरताच गांधीजींनी निर्वा-णीचे पाऊल टाकले.

गांधीजी शुद्ध सत्याग्रही. त्यांची लढाई सत्याची. त्या लढाईत गुप्त काही नसते.

२ मार्च, १९३० रोजी गांधींजींनी व्हाईसरॉयना निर्वाणीची नोटीस पाठविली, '. . . त्या अकरा मागण्यांच्या बावतीत आपण काही केले नाही, तर या महिन्याच्या १२ तारखेला निवडक आश्रमवासीयांसह मी मीठ कायद्याचा भंग करण्याच्या मोहिमेवर निघेन. मीठावरील कर हा गरीबांच्या दृष्टीने सर्वात अन्याय कर आहे, असे मी मानतो. स्वातंत्र्य आंदोलन हे गरिबांसाठीच असल्याने मीठ कायदा मोडण्यापासून आंदोलनास प्रारंभ होईल.'

रेजिनाल्ड रेनाल्डस् नावाचा एक तरुण इंग्रज गांधीजींच्या साबरमती सत्याग्रह ;आश्रमात येऊन राहिला होता. भारतीय स्वातंत्र्यावर व अहिंसेवर त्याची गाढ श्रद्धा. २ मार्चला रात्रीच गांधीजींचे नोटिशीचे पत्र घेऊन तो दिल्लीला रवाना झाला.

गांधीजींचे हे निर्वाणीचे पत्र भारतीय आणि परदेशी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले.

घरात, रस्त्यात, बाजारात, संपादकांच्या कचेऱ्यांत, देश-भर चर्चा सुरू झाली.

या म्हाताऱ्याला काय वेड लागलं आहे की काय ? म्हणे मिठाचा कायदा मोडून इंग्रजांना हाकलून देणार !'

' सुतानं स्वराज्याचा स्वर्ग गाठण्याचं त्याचं नाही का फॅड ? तसलाच हा प्रकार.'

'अरे, तुम गांधी को क्या जानते हो ? वह तो जादुगर है । जल्दही उसकी जादू खुलेगी । देखते रहो तुम सिर्फ ।'

' हा ६१ वर्षांचा म्हातारा मध्येच गचकेल.'

'गांधी तो महात्मा है। वह जो कहेगा उसको हम मानेंगे।'

अशी उलटी सुलटी चर्चा.

परंतु गांधीजी निश्चल होते. शंकेखोरांना आणि टीका-कारांना ते समजावून सांगत होते---

'हिंदुस्थानातील गरिबांची रोजची कमाई दोन आणे सुद्धा नाही. व्हाईसरॉयला मात्र रोज ७०० रुपये पगार आहे.'

'गरिबाला मिठासाठी दरसाल तीन दिवसांची कमाई खर्च करावी लागते.'

'१० पैच्या मीठावर २०० पैसे कर हा अन्याय आहे. भयंकर अन्याय आहे.'

'स्वातंत्र्य गरिबांसाठी आहे. माझ्या मागे या जुलमी कायद्याचा भंग करण्यासाठी हजारो लोक शिस्तीने येतील अशी मला आशा आहे.'

सरकार काय करील? लोक उत्सुकतेने विचारीत होते, गांधीजींना सरकार अगोदर पकडेल?

खरे तर काय करावे या गोंधळात सरकार पडले होते. विठ्ठलभाईंनी व्हाईसरॉयना सल्ला दिला, २४१ मैल चालून गांधीजी दांडीला पोचतील की नाही? शंका आहे. तेव्हा त्यांना आधीच पकडून कशाला टीका ओढवून घेता?'

गांधीजींची आशा खरी ठरत होती. अनेक प्रांतातून त्यांना शेकडो पत्रे येऊ लागली, 'आम्हाला आपल्या मोहिमेत घ्या.'

देशातील एका क्रांतिकारक पक्षाने संदेश पाठविला, ‘भाई गांधी, तुमच्या अहिंसेला आम्ही तीन वर्षे संधी द्यायला तयार आहोत—–’

डॉ. सण्डरलण्ड, रॉजर बोर्डविन, जॉन हेलन्स होम, इत्यादी अनेक प्रसिद्ध अमेरिकनांनी गांधीजींना पत्र पाठवून पाठिंबा जाहीर केला.

एका जर्मन डॉक्टरने स्वत: चितारलेले एक चित्र पाठविले गांधीजींसाठी एक नम्र यात्रिक प्रार्थना करीत आहे असे ते चित्र होते.

साबरमती आश्रमात गांधीजींना भेटायला येणाऱ्यांची रीघ लागून राहिली होती. अनेक देशी--विदेशी पत्रकार त्यांची मुलाखत घेत होते.

गांधीजींच्या नोटीशीला व्हाईसरॉयच्या वतीने त्यांच्या खाजगी चिटणीसांनी उत्तर दिले,—–– ‘ तुम्ही स्वीकारलेल्या मार्गाबद्दल त्यांना दिलगिरी वाटते. कारण त्या मार्गामुळे कायदा मोडला जाऊन शांततेला धोका पोहोचेल हे स्पष्ट आहे . . .’ गांधीजी म्हणाले, ‘ मी मागितली होती भाकरी पण मिळाला धोंडा.’

गांधीजींच्या मोहिमेचा कार्यक्रम निश्चित झाला. दांडी. सुरत जिल्हयातील समुद्र किनाऱ्यावरील एक छोटेसे खेडे. साबरमती आश्रमापासून २४१ मैल दूर. १२ मार्चला सकाळी आश्रमापासून कूच करायची आणि ५ एप्रिलला दांडीला पोचायचे. ६ एप्रिलला सकाळी मिठाचा कायदा किनाऱ्यावरील मीठ उचलून मोडायचा. गांधीजींबरोबर साबरमती आश्रमातील निवडक फक्त ७८ आश्रमवासी सत्याग्रही राहतील.

त्यामध्ये सर्व प्रातांचे सत्याग्रही होते. महाराष्ट्राचे १४ होते. सर्व जातिधर्मांचे होते. मुसलमान, ख्रिश्चन, हरिजन वगैरे.

दांडी यात्रेची तयारी सुरू झाली.

सरदार पटेल आणि शेकडो कार्यकर्त्यांनी गांव न् गांव प्रचाराने पिंजून काढले.

भावी रणसंग्रामासाठी तयार राहण्याचे आवाहन सरदार करीत होते. आपल्या गुजराती बांधवांना ते सांगत होते,

'आपला गुजरात म्हणजे व्यापाऱ्यांचा व शेतकऱ्यांचा देश. त्याने कधी तलवार घेतली नाही; तोफांचे आवाज ऐकले नाहीत; लढाई पाहिली नाही. अशा गुजरातमध्ये गांधीजी धर्मयुद्ध करायला निघाले आहेत. हे आपले सद्भाग्य आहे. नामर्दाचे मरण मरण्यापेक्षा मर्दाचे मरण मरायला तयार राहा.---'

पुरुषसिंह सरदारांच्या स्फूर्तिदायी शब्दांनी साऱ्या गुजरात-मध्ये चैतन्याची लाट पसरली.

सरकारला ते सहन होणे शक्य नव्हते. ५ मार्चला सरदारांना अटक झाली आणि एक प्रकारे १२ मार्च अगोदरच लढा सुरू झाला. साऱ्या जगाचे लक्ष १२ मार्चकडे लागलें होते. साबरमतीकडे होते. गांधीजींना सरकार पकडणार अशी वदंता पसरली होती.

साबरमतीचा सत्याग्रह आश्रम तीर्थक्षेत्र झाले.

११ मार्चला दांडी यात्रेचे दिव्य दृश्य पाहाण्यासाठी हजारो

लोक अहमदाबाद मध्ये पोहोचले होते. देश--परदेशांतील पत्रकार, फोटोग्राफर, फिलमवाले यांचे ताफेच्या ताफे आले होते.

११ मार्च. सायंकाळची ७।। ची वेळ. साबरमती आश्रमासमोरील साबरमती नदीच्या विस्तीर्ण वाळवंटात सारे अहमवाद लोटले होते. ७५ हजारांची विराट प्रार्थनासभा जमली होती. दीडलाख डोळे गांधीजींची वाट पाहात होते.

उंचच उंच शिडी हळुहळू चढून गांधीजी व्यासपीठावर आले. दीर्घकाळ टाळयांचा प्रचंड कडकडाट होत होता. घोषणा आकाशाला भेदून जात होत्या. गांधीजींनी हात जोडून विशाल जनसमुदायाला अभिवादन केले.

'इतक्या प्रचंड संख्येने तुम्ही येथे जमलात याचे रहस्य काय माहीत आहे ? आपली लढाई अहिंसक आहे म्हणून. मी सशस्त्र क्रांतीची हाक दिली असती तर येथे हजारो लोक आले नसते---' गांधीजी बोलू लागले,

'आपली मागणी न्याय्य आहे, आपला मार्ग शुद्ध आहे. आणि जेथे साधन शुद्ध आहे तेथे परमेश्वराचा वास आहे.

'तुम्ही स्वतःच तुमचे नेते व्हा. ज्याला निर्भयतेचा व मरणाचा मंत्र कळला त्याला कोण मारू शकेल ?

'माझा जन्म ब्रिटिश साम्राज्याच्या विनाशासाठीच आहे. मी कावळयाचे मरण देखील मरेन. कुत्र्याची मौतसुद्धा मरीन पण स्वराज्य मिळविल्याशिवाय परत या आश्रमात पाऊल टाकणार नाही.'

७५ हजारांच्या विराट जनसमूहात एकदम विलक्षण शांतता पसरली.

कोणीतरी सुचविले, 'प्रतिज्ञा घेऊं या.' प्रतिज्ञेचा ठराव मांडण्यात आला–

'सरदार वल्लभभाई पटेल ज्या मार्गाने गेले त्याच मार्गाने जाण्याचा आमचा निर्धार आहे. स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही आणि सरकारलाही शांति लाभू देणार नाही. भारताची मुक्ती सत्य अहिंसेच्या मार्गानेच होऊ शकेल असा आमचा विश्वास आहे . . .'

'हात वर करून प्रतिज्ञा घेतल्याचे जाहीर करा,' असे गांधीजींनी आवाहन करताच संपूर्ण सभेचे हात वर झाले.

सरदार पटेलांच्या गिरफतारीमुळे वातावरण तापले. अनेक प्रांतांतून स्त्री-पुरुष सत्याग्रहींची पथके साबरमतीस पोचली होती. दांडीयात्रेत आम्हाला घ्या असा आग्रह करीत होती, पण त्यांना निराश व्हावे लागत होते; कारण गांधीजी आश्रमातील फक्त निवडक सत्याग्रहींनाच बरोबर घेणार होते. परप्रांतातून आलेल्या सत्याग्रहींना दुसऱ्या वा तिसऱ्या सत्याग्रह कार्यक्रमात या असे सांगण्यात आले. आश्रमातील आणि बाहेरील अनेक महिला 'आम्हाला सत्याग्रह यात्रेत घ्या,' असा हट्ट गांधीजीं-समोर धरून बसल्या, पण गांधीजींनी नकार दिला. कारण हा सेनापती बायकांना पोलिसांच्या पुढे करून सत्याग्रहाची लढाई लढू पाहात आहे असा आरोप व्हायला नको होता.

सभेला आलेल्यांपैकी हजारो श्रोते त्या रात्री साबरमतीच्या वाळवंटात मुक्काम करून होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी गांधीजींना निरोप द्यायचा

होता. काहींनी आश्रमाभ्रवर जागता पाहारा ठेवला. गांधीजींना रात्रीच सरकारने पकडले तर ? आपल्या प्रिय बापूंचे--गांधीजींचे पुन्हा लौकर किंवा कदाचित कधीच दर्शन होणार नाही.

परंतु गांधीजींना पकडणार असल्याची बातमी अफवाच ठरली.

११ मार्चची रात्र संपूर्ण आश्रम जागा होता. शांतपणे झोपले होते फक्त गांधीजी.

१२ मार्चची पहाट उजाडली. आश्रमवासी व ७८ पद-यात्री गांधीजींभोवती प्रार्थनेसाठी जमले. सुरेल स्वरांत एकजण गांधीजींचे आवडते गीत गाऊं लागला---

वैष्णव जन तो तेने कहिये
जो पीड पराई जाने रे
रघुपति राघव राजाराम
पतीत पावन सीताराम
ईश्वर अल्ला तेरो नाम
सबको सन्मति दे भगवान

या गीताचे मंजुळ स्वर शांत होतात न होतात तोच खरे शास्त्रींचा पहाडी आवाज घुमूं लागला-----

शूर संग्राम को देख भागे नहीं
देख भागे सोई शूर नहीं

त्या मागोमाग भक्त प्रीतम यांच्या गीताचे सूर उमटूं लागले--

हरिनो मारग छे शूरानो
नहीं कायरनु काम जोने—

प्रार्थना संपली.

गांधीजी उठले. प्रत्येक आश्रमवासीयाला जवळ बोलावून त्याच्या पाठीवर हात फिरवून निरोप घेतला. रोग्यांची विचार-पूस केली.

साबरमती आश्रमातील त्यांची ही शेवटची प्रार्थना आहे या जाणिवेने आश्रमवासीयांनी गांधीजींना ओल्या डोळ्यांनी निरोप दिला.

गांधीजींच्या चेहऱ्यावर मात्र मंद हास्य होते.

कमरेपर्यंत लटकणारी थैली मानेत अडकविली आणि झपझप पायऱ्या उतरीत गांधीजी आश्रमाच्या आवारातील वट-वृक्षाखाली येऊन उभे राहिले.

छायाचित्रकार आणि फिल्मवाल्यांचे कॅमेरे क्लिक् क्लिक् करीत फिरू लागले.


गांधीजींच्या पत्नी कस्तुरबांनी त्यांना कुंकुमतिलक लावला. हातात त्यांची उंच काठी दिली आणि प्रणाम केला.

बरोबर सकाळी ६-२० वाजता गांधीजी आश्रमाच्या फाटकाबाहेर पडले. त्यांच्या आजूबाजूला आणि मागे कस्तुरबा, अब्बास तय्यबजी, सरोजिनी नायडू, महादेवभाई देसाई, प्यारेलाल आणि त्यांचे मागे ७८ पदयात्री होते.

६१ वर्षांच्या त्या तरुण सेनापतीच्या नेतृत्वाखाली केवळ ७८ पायदळ सैनिकांची ती ऐतिहासिक दांडीकूच सुरू झाली. त्या सेनेजवळ बंदुका नव्हत्या, की तलवारी नव्हत्या, तोफा नव्हत्या कि रणगाडे नव्हते. सैनिकांपाशी होते फक्त मनोबल आणि ध्येयनिष्ठा.

आत्मक्लेषाने शत्रुवर विजय मिळवायला निघालेली

निशस्त्र सेनेची अशी कूच साऱ्या जगाने यापूर्वी कधीही पाहिली नव्हती.



गळ्यात तंबोरा अडकवून खरेशास्त्री पुढे चालले होते. त्यांच्यामागे सेनापति गांधीजी आणि खांद्यावर लष्करी जवानाप्रमाणे आपला बिस्तरा घेतलेले, गळ्यात पिशवी अडकविलेले ७८ सत्याग्रही दोनदोनच्या रांगेत धीरगंभीरपणे चालले होते.

आणि त्यांच्यामागून आणि दोन्ही बाजूंनी अक्षरशः हजारो लोक त्यांना अहमदाबादच्या वेशीपर्यंत पोचविण्यासाठी निघाले होते.

अशी ही लोकगंगा वाहात होती. काफिला चालला होता. चालत होता कसला? जवळजवळ धांवतच होता. कारण ६१ वर्षांचा युवकसेनापती झपझप धावल्यासारखा चालला होता.

छायाचित्रकार, फिल्मवाले आणि शेकडों पत्रकार यांची धावपळ होत होती. त्यांना गांधीजींच्या गतीने चालावे लागत होते.

गांधीजी व पदयात्रिक जसजसे अहमदाबाद शहरापाशी आले तसतशी स्त्री-पुरुष प्रेक्षकांची अलोट गर्दी त्यांना पाहण्यासाठी लोटू लागली. रस्त्यांवर, घरांच्या छपरांवर, झाडांवर, सज्जांमध्ये जागा मिळेल तेथे हजारो लोक अगोदरपासून जागा धरून उभे होते. गांधीजींच्या जयजयकाराने आकाश निनादून टाकीत होते. गांधीजी काठीचा हात उंचावून अधूनमधून सस्मित मुद्रेने त्या स्वागताचा स्वीकार करीत होते.

अहमदाबाद शहराच्या कडेचे गुजरात विद्यापीठ व एलिस ब्रिज पार करून गांधीजींचा सत्याग्रही काफिला जवळजवळ चार मैल चालून आला होता. ऊन जाणवू लागले होते. तरीही गांधीजींना निरोप देण्यासाठी एक लाख लोक त्यांच्यावरोबर चालले होते.

गांधीजींवरोबर त्यांच्या पत्नी कस्तुरबा चालत होत्या.

पांच-सहा मैलांवर प्रीतमनगरमध्ये प्रवेश करताच गांधीजींनी कस्तुरबांच्या खांद्यावर हात ठेवून हसत हसत त्यांना परतायला सांगितले. त्या परतल्या.

सातव्या मैलावर चंडोल तलाव आला. तेथे गांधीजी व यात्रिक अंमळ विश्रांतीसाठी थांबले. त्यांच्याबरोबर आलेला

अमर्याद लोकसमूहही रेंगाळला. कोणीच परतायला तयार नव्हते. 'आता जा,' गांधीजींनी परोपरीने सांगून पाहिले, तरीही कोणी जागचे हालेना. गांधीजी सांगत होते, 'तुम्ही सर्व माझ्यावरील प्रेमाने येथवर आलात. रात्रभर आश्रमाच्या आसपास सकाळपर्यंत माझ्यासाठी जागलात. माझ्यावर तुमचे एवढे प्रेम असेल तर परदेशी वस्तू टाका, खादीचे काम करा, चरखा चालवा, दारु सोडा, अस्पृश्यता नाहीशी करा.'

अखेर बरेचसे लोक परतले. तरीही ६–७ हजार लोक रात्रीच्या पहिल्या मुक्कामापर्यंत यात्रिकांबरोबर होतेच.

१३ मैलांवरील असलाली या गांवी यात्रिकांचा पहिला पडाव पडला. वाटेत गांवागावांत, रस्त्याच्या दुतर्फा दर्शनार्थी खेडुतांची गर्दी उत्सुकतेने उभी होती जयघोष करीत होती. गुढ्या–तोरणे उभारून स्वागतासाठी सज्ज होती.

असलाली गांवापासून एक मैलावर सायंकाळी गांधीजी व यात्रिक पोचले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी हजारो खेडुत सामोरे आले.

जयघोष आणि ढोल, झांजा, शंख व कर्ण्यांच्या आणि थाळ्यांच्या आवाजांनी वातावरण भरून गेले. तिरंगी झेंडे, ध्वजा–तोरणे, कमानी आणि फुला-पानांच्या माळांनी संपूर्ण गांव शृंगारले होते. सारे गाव कसे स्वच्छ दिसत होते. रस्त्या-वर सडा टाकला होता.

गांधीजी आणि यात्रिकांनी गावच्या धर्मशाळेत मुक्काम टाकला.

दिवस मावळतीच्या सभेत दांडी यात्रेतील गांधीजींचे

पहिले भाषण झाले. त्यांनी निर्धार जाहीर केला, ' मिठावरील कर रद्द होईपर्यंत आणि स्वराज्य मिळेपर्यंत मी परत साबरमती आश्रमात जाणार नाही. या यात्रेतील सैनिकांनी उसळलेल्या समुद्रात नाव टाकली आहे. आता परत फिरणे नाही. मीठ कर रद्द करून घेण्यासाठी आपण मृत्युलाही कवटाळण्यासाठी सिद्ध झाले पाहिजे. या कराला मूठमाती देऊन स्वराज्याच्या दिशेने पहिले पाऊल टाका.'

दुसऱ्या दिवशी सकाळी बरोबर सहा वाजता यात्रिकांसह गांधीजींनी पुढील गावासाठी प्रस्थान ठेवले. एकेक मुक्काम मागे टाकीत त्यांचे निःशस्त्र सैनिकांचे पायदळ पुढे पुढे चालले होते. चैत्र–वैशाखातील रणरणते ऊन. धुळीने भरलेली रुक्ष जमीन, ओढेनाले, खाचखड्डे ओलांडीत रोज किमान ५ ते १० मैल तरी गांधीजींचा कृश देह झपाझप चालत होता. दुसऱ्यातिसऱ्या दिवशी गांधीजी काहीसे थकलेले दिसले. त्यांच्यासाठी बसायला घोडा तयार ठेवला होता. पण गांधीजींनी त्यावर बसून यात्रा करायला नकार दिला.

रोज सकाळी कडक ऊन पडायच्या आंत पुढच्या गांवाला पोचायचे. सायंकाळी ऊन्हे कलल्यावर त्यापुढील गावाकडे जायला निघायचे. दिवसाकाठी दोन गावे असा कार्यक्रम चालू होता. गांधीजी व यात्रिक पोचण्यापूर्वीच ते येत असल्याचा संदेश त्या गावी पोचलेला असायचा. अरुणोदय दल नावाच्या खास स्वयंसेवक पथकाकडे हे काम सोपविलेले होते.

दांडी यात्रिकांचे हे पथक म्हणजे फिरता आश्रमच होता. आश्रमातली सारी शिस्त यात्रेतही सांभाळली जात होती. रोज सकाळ–संध्याकाळ प्रार्थना होत होती. कधीकधी रस्त्यावर

थांबूनसुद्धा. प्रत्येक यात्रिक रोज चरख्यावर सूत कातीत होता. रोज रोजनिशी लिहित होता. प्रार्थनेनंतर गांधीजी भाषण करीत असत. सहयात्रिकांना त्यांची जबाबदारी समजावून सांगत असत. एखाद्याने काही चूक केली तर त्याला सौम्य कानपिचक्या देत असत. वेळेवर कामे होण्याला फार महत्त्व होते. गांधीजी सांगत असत, ' आपली यात्रा ही पवित्र यात्रा आहे. प्रत्येक क्षणाचा आपल्याला हिशोब द्यायला पाहिजे.'

गांधीजींनी पहाटे ४ वाजता उठण्याचा आपला नियम एवढ्या कष्टदायक यात्रेतही कधी मोडला नाही. ४ वाजता उठून आपला पत्र-व्यवहार ते पाहात. एकदा त्यांचा कंदील रॉकेल संपल्यामुळे विझला तेव्हा ते चांदण्याच्या प्रकाशात पत्रे लिहित बसले.

दर सोमवारी यात्रिक विश्रांतीसाठी मुक्कामाच्या गावी राहात. सोमवार हा गांधीजींच्या मौनाचा दिवस. तरीही शेकडो लोक त्यांना भेटायला येत. काही नुसते दर्शनासाठी, तर काही त्यांच्याशी बोलण्याकरिता. गांधीजी पाटीवर नाहीतर कागदावर लिहून उत्तरे देत.

दोनशे–एकेचाळीस मैल लांबीच्या यात्रामार्गावरील प्रत्येक मुक्कामाच्या जागी, वाटेवरच्या गावी गांधीजी व त्यांच्या यात्रा पथकाची उत्सुकतेने वाट पाहात हजारो खेडूत उभे राहात. भव्य स्वागत होई. पैशाच्या थैल्या भेट म्हणून मिळत.

गांधीजी म्हणत, ' मला पैसे नकोत. माणसे पाहिजेत. पैशाने स्वराज्य मिळणार नाही. मला तुमचे रक्त हवे आहे. पैशाने स्वराज्य खरीदता आले असते तर ते मी कधीच खरेदी केले असते.'

गांधीजींच्या आवाहनाला प्रचंड साथ मिळत होती. लोक निर्भय झाले होते. हजारो खेडुत सत्याग्रही गांधीजींच्या सेनेत दाखल होण्यासाठी अहमहकीने पुढे येत होते.

यात्रेच्या सहाव्या मुक्कामावर आणंद येथे खड्गबहादुर-सिंह नावाचा एक नेपाळी गुरखा युवक यात्रेत सामिल झाला. गांधीजींना तो म्हणाला, 'जालियनवाला बागेमध्ये आम्ही गुरख्यांनी १००० निरपराध, नि:शस्त्र स्त्री-पुरुषांची हत्या केली. त्या पापाचे प्रायश्चित घेण्यासाठी मला आपल्या सत्याग्रहात सामील व्हायचे आहे.' अधिक लोक यात्रेत घ्यायचे नाहीत हा आपला निर्णय गांधीजींना त्या गुरखा युवकासाठी बदलावा लागला.

गाव पाटलांना व सरकारी नोकरांना गांधीजी आवाहन करीत होते, 'ज्या सरकारने आपला देश बरबाद केला आहे त्याची नोकरी करणे पाप आहे.'

शेकडो पाटील, तलाठ्यांनी गांधीजींचा आदेश मानला. काहींनी नोकरी सोडण्याचे आश्वासन दिले. तेव्हा गांधीजींनी त्यांना सुनावले, ' रघुकुल रीत सदा चलि आई, प्राण जाय पर वचन न जाय, ' अशा रघुकुलाचे आपण वंशज आहोत हे लक्षात ठेवा.'

सरकारी अधिकारी, गांवपाटलांना व तलाठ्यांना ' राजीनामे द्याल तर त्याचे परिणाम भोगावे लागतील ' अशा धमक्या देत फिरत होते. तरी शेकडो राजीनामे धडाधड येत होते.

डेप्युटी कलेक्टर, मामलेदार, तलाठी वगैरे सरकारी लोक खेड्यांत सरकारी कामासाठी आले की आपल्या खाण्यापिण्याची,

राहण्याची व्यवस्था ते नेहमीच्या संवयीप्रमाणे गांवकऱ्यांकडून फुकटात करून घेत असत. गांधीजींनी सरकारी अधिकाऱ्यांवर बहिष्कार घालण्याचा आदेश दिला. अधिकाऱ्यांना खेड्यांत अन्नच काय, पण पाणीही मिळणे मुश्किल झाले.

यात्रा मार्गावरील आणि आसपासच्या गांवागांवात जणु विद्युत् संचार झाला होता. गांधीजींनी जादू केली होती. सर्व वातावरण गांधीमय झाले होते. जनतेच्या मनावर ब्रिटिश सरकारची नाही तर गांधीजींची सत्ता दिसत होती.

यात्रा जवळपास अर्ध्यावर आली तेव्हा तर गांधीजींच्या वाणीतील आवेशाने आणि उत्कटतेने शिखर गाठले. त्यांच्या शब्दाशब्दांत ब्रिटिश सत्ता तत्काळ नष्ट करण्याची त्यांच्यातील प्रखर भावना ओतप्रोत भरलेली होती.

नप्पा, बोरसद आणि रासमधील भाषणांत गांधीजींनी गर्जना केली,

'ब्रिटिश सत्ता हा हिंदुस्थानला मिळालेला शाप आहे असे मी मानतो. मी तिचा नाश करण्यासाठी बाहेर पडलो आहे. लौकरात लौकर ब्रिटिश सत्ता उखडून फेकून देणे हा मी माझा धर्म समजतो.

'राजद्रोह हा आता माझा धर्म बनला आहे. तुम्हीही तो आपला धर्म माना आणि या राक्षसी सरकारचा नाश करा.'

परंतु केवळ ब्रिटिश सत्तेचा नाश हे गांधीजींचे ७।६९८ कधीच नव्हते. त्यांना स्वतंत्र हिंदुस्तान स्वच्छ, आरोग्यसंपन्न असायला हवा होता. म्हणून ते आपल्या भाषणात स्वच्छतेचा व ग्रामसफाईचा उपदेश करीत. त्यांना स्वतंत्र भारत स्वावलंबी

व्हायला हवा होता, म्हणून ते विदेशी मालाच्या बहिष्काराचा, खादीचा आणि चरखा चालविण्याचा संदेश देत. स्वतंत्र हिंदुस्थानात त्यांना हिंदु-मुसलमान भावा-भावासारखे राहात आहेत हे पहायचे होते. म्हणून ते त्यांना एकमेकांवर प्रेम करायला शिकवीत. स्वतंत्र हिंदुस्थानवर अस्पृश्यतेचा कलंक असता कामा नये असा त्यांचा प्रयत्न होता. म्हणून अंत्यजांशी भेदभावाने वागू नका असे सवर्णांना ते आवाहन करीत. आपला देश गरीब आहे. नेत्या-कार्यकर्त्यांनी गरिबांसारखे राहिले पाहिजे. त्याचा आदर्श गांधीजींनी स्वतःच घालून दिला होता. गांधीजी सांगत, 'गरीब देशाला न शोभणारे जीवनमान जगणे म्हणजे चोरीच्या अन्नावर जगणे होय. स्वातंत्र्याची लढाई चोरीचे अन्न खाऊन कधीच जिंकता येणार नाही.'

यात्रिक सत्याग्रहींनी साधे अन्नच घेतले पाहिजे; गरीब खेडुतांवर आपल्या चैनीच्या जेवणाचा बोजा टाकता कामा नये असा गांधीजींचा कटाक्ष होता. एकदा काही सत्याग्रहींनी सुरतेहून दूध व भाज्या खाण्यासाठी मागविल्या तेव्हा गांधीजींनी त्यांची कानउघाडणी केली.

एकेक दिवस मागे टाकीत अशा रीतीने दांडी यात्रा पुढे सरकत होती. प्रांताप्रांतांतील स्वातंत्र्यवादी देशीभाषी वर्तमानपत्रात यात्रेची सविस्तर वर्णने आणि छायाचित्रे येत होती. दांडीयात्रेची बातमी देशाच्या कानाकोपऱ्यात पोचत होती.

अनेक शहरांतील चित्रपटगृहात दांडी यात्रेचे वृत्तचित्र दाखविले जाऊ लागले. तेव्हा सरकार बिथरले. बंदी घातली. गांधीजींच्या चिटणीसांनी पत्रक काढून सरकारला सुनावले, 'खुशाल बंदी घाला. भारताचा स्वातंत्र्यलढा सिनेमांतल्या

प्रचारावर मुळीच अवलंबून नाही.'

काँग्रेस अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरूंनी देशातील जनतेला आवाहन केले, 'हजारो-लाखोंनी शपथ घ्या, आम्हाला सविनय सत्याग्रहात सामील व्हायचे आहे. त्यासाठी तुरुंगात जायची आणि वाटेल त्या हालअपेष्टा सहन करायची आमची तयारी आहे...'

' गावागावांत, शहराशहरांत हजारो जाहीर सभा सुरू झाल्या आणि दशसहस्रावधि लोक स्वातंत्र्याच्या आगामी लढाईत दाखल होण्याची शपथ घेऊ लागले.

देशभर देशभक्तीची लाट पसरली.

झेंडावंदने, प्रभातफेऱ्या निघू लागल्या. सरकारने जाहीर सभा-मिरवणुकांना बंदी घातली. तिला भीक न घालता जनता रस्त्यावर येऊ लागली.

जनतेमधील वाढत्या लढाऊ भावनेला पायबंद घालण्यासाठी सरकारने जाहीर केले, 'जनतेला कमी दरात मीठ कसे मिळेल हे पाहाण्यासाठी मीठावरील कराचा विचार फेरविचार करायला सरकार तयार आहे.'

गांधीजींनी ही सूचना धुडकावली. ते आपल्या निश्चयावर अढळ होते. नवसारीच्या जाहीर सभेत त्यांनी घोषणा केली, 'मी एकतर मला हवे आहे ते मिळवीन, नाहीतर माझे मृत शरीर या महासागराच्या लाटांवर तरंगताना दिसेल.'

गांधीजी आणि त्यांची सत्याग्रही यात्रा अरबी सागराच्या दिशेने झेपावत होती. सागर किनाऱ्यावरील दांडी येथे ती संपणार होती. आता दांडी फक्त चौदा-पंधरा मैलांवर होती. ४

एप्रिलला गांधी जलालपूरला आले. तेथील सभेत त्यांनी घोषणा केली, 'माझी यात्रा संपत आली आहे. उद्या ५ तारखेला मी दांडीला पोचेन आणि ६ तारखेला खाडी किनाऱ्यावरील मीठ उचलून मीठ कायद्याचा भंग करीन.'

आणि त्याच दिवशी म्हणजे ६ एप्रिलला देशव्यापी सविनय कायदेभंग आंदोलनाला प्रारंभ करण्याचा गांधीजींनी आदेश दिला.

५ एप्रिलला सकाळी ७ च्या सुमारास मातवाद गांवाहून गांधीजी सहयात्रिकांसह दांडीला पोचले.

तीन दिवस विश्रांतीचे सोडले तर तब्बल २२ दिवस गांधीजींचा कृश देह रोज ५ ते १०–१२ मैल चालत होता. कधी म्हणून त्यांचा चेहरा कोमेजलेला दिसला नाही. चेहऱ्यावर त्यांचे सदैवचे निर्मळ हास्य. बरोबरीच्या लोकांशी हास्य-विनोद

हजारो लोकांनी 'वंदेमातरम्' व 'म. गांधी की जय' च्या घोषात त्यांचे स्वागत केले.

दांडी–समुद्राच्या खाडी-किनाऱ्यावरील एक अगदी लहानसे खेडे. बऱ्यापैकी स्थितीतल्या लोकांची दहाएक घरे आणि शंभरेक खोपटी मासे मारून निर्वाह करणाऱ्या कोळ्यांची. वस्तीच्या एका बाजूला समुद्र व बाकीच्या तीन बाजूंना वाळूने भरलेले उजाड जमिनीचे पट्टे.

असे हे अप्रसिद्ध खेडे जगाच्या स्वातंत्र्य इतिहासात आपल्या वैशिष्ट्याने अमरस्थान मिळविणार होते.

मुंबईचे एक मुसलमान व्यापारी श्री. वासी यांच्या सागर-

किनाऱ्यावरील छोटयाशा घरात गांधीजींनी मुक्काम टाकला. तेथून समोर संपूर्ण समुद्रकिनाऱ्यावरचे मनोरम दृश्य दिसत होते आणि किनाऱ्यावरील वाळूत समुद्राच्या पाण्यातून बन-लेले नैसर्गिक मिठाचे लहान मोठे पट्टे.

सागर किनाऱ्यावरील वाळूच्या विस्तीर्ण मैदानात सायं-काळी जाहीर सभा झाली. आसपासच्या आणि गुजरात-महा-राष्ट्रातल्या एवढेच नव्हे तर साऱ्या देशातल्या अनेक शहरां-गांवातील सहस्रावधि लोक सभेला आले होते. सभेत गांधीजी म्हणाले,

'मी आणि माझ सहयात्रिक दांडीपर्यन्त पोचलो; आम्हाला पकडले नाही हा सत्याचा व सत्याग्रहाचा विजय आहे असे मी समजतो.

'उद्यां सरकार काय करील हे मला माहीत नाही. सरकार काहीही करो, मीठावर कर नाही असेच तुम्ही उद्या-पासून समजा.

'मी उद्या सकाळी सरकारी मीठकर कायद्याचा भंग करून मीठ उचलेन. त्यानंतर साऱ्या देशात कायदा मोडून मीठ बनवायला प्रारंभ होईल.

'नेत्यांना पकडले तरी तुम्ही तुमचे काम करीत राहा. इतक्या वर्षांच्या सत्याग्रहांनी तुम्हाला पुढाऱ्यांशिवाय कसे लढायचे हे शिकविलेच आहे.

'मीठकर नाहीसा करूनच हे आंदोलन संपेल.

'पण एक गोष्ट लक्षात ठेवा. आपले खरे ध्येय मीठ-कराचा नाश करणे हे नाही तर स्वातंत्र्य प्राप्त करणे हेच आहे.

'हिंदुस्तानला स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यन्त मी स्वस्थ बसणार नाही आणि सरकारलाही स्वस्थ बसू देणार नाही.'

वृत्तपत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत गांधीजी म्हणाले, 'सत्य विरुद्ध सत्ता असा हा लढा आहे. त्यात मला सर्व जगाची सहानुभूति हवी आहे.'

गांधींजींचा मुक्काम होता त्या घराच्या आवारात थोडा पोलिस बंदोबस्त होता. आश्चर्य म्हणजे पोलिसांचा प्रचंड फौजफाटा अनुपस्थित होता.

६ एप्रिलला पहाटे चार वाजता दांडीच्या सत्याग्रह छावणीत हालचाल सुरू झाली. यात्रिकांसह गांधीजींनी प्रार्थना केली. त्यावेळी त्यांनी पुढील कार्यक्रमाची कल्पना देताना सांगितले,

'मला पकडले तर माझी जागा जनाब अब्बास तय्यबजी घेतील. त्यांच्यानंतर सरोजिनी नायडू तुमचे नेतृत्व करतील.

'अहिंसेवर विश्वास ठेवा. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही तिचा त्याग करू नका.'

प्रार्थना संपवून सूर्योदयापूर्वीच गांधीजी आपल्या निवासस्थानाच्या पायऱ्या उतरून खाली आले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी सुमारे चार हजारांचा जनसमुदाय उभा होता. त्यांत शेकडो खेडुत, शहरी नागरिक स्त्री-पुरुष सामिल होते. गांधीजींनी आपल्या नंतरचे सत्याग्रहाचे सेनानी म्हणून नियुक्त केलेले अब्बास तय्यबजी व सरोजिनी नायडू उपस्थित होते.

गांधीजींनी शांतपणे समुद्रस्नान केले आणि शुचिर्भूत होऊन सागर किनाऱ्यावरील वाळूच्या मैदानात एके ठिकाणी गेले. तेथे नैसर्गिक मिठाची काही ढेकळे पडलेली होती.

गांधीजी दांडीला पोचण्यापूर्वीच सरकारने दांडीच्या किनार-पट्टीवरील बरेचसे मीठ उचलून फेकून दिले होते. उरलेल्या मिठातले गांधीजींनी खाली वाकून मूठभर मीठ उचलले आणि हात उंचावून उपस्थित जनसमुदायाने 'नमक कानून तोड दिया,' अशी घोषणा केली. ती वेळ बरोबर सकाळची ६–३० ची होती.

गांधीजींनी उचललेले मूठभर मीठ त्या क्षणी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नवे प्रतीक बनले.

भारतातील व विदेशातील शेकडो छायाचित्रकारांनी तो ऐतिहासिक क्षण आपल्या कॅमेरांनी टिपून घेतला.

हजारो कंठातून ध्वनि निघाला, 'वंदेमातरम्'

पोलिस स्वस्थ उभे होते. गांधीजींना त्यांनी हात लावला नाही. गांधीजींना इतक्यात पकडायचे नाही; कारण पकडले तर आंदोलन भडकेल आणि पकडले नाहीतर गांधीजींचा आंदो-लनाचा वार फुसका ठरेल, असे सरकारचे गणित होते.

गांधीजी परत आपल्या निवासस्थानी गेले आणि स्वस्थ-पणे पत्रव्यवहार पाहात बसले.

इकडे त्यांच्याबरोबरच्या ७८ सत्याग्रहींनी आपल्या दोन तुकड्या केल्या. त्यांचा एकेक नेता बनला. नेत्यांनी आपापल्या तुकडीला पुढे काय करायचे याच्या सूचना दिल्या.

नेत्याने शिटी फुंकताच एक तुकडी खाडीच्या तोंडाशी गेली आणि तेथे जमलेले मीठ भराभर थैल्यात भरू लागली. दुसरी तुकडी सागरकिनाऱ्यावरच चुली पेटवून त्यावर समुद्राचे खारे पाणी उकळून मीठ बनवू लागली. दुसरे नवे ५० सत्या–

ग्रही स्वयंस्फूर्तीने पुढे आले आणि पोती भरून मीठ घेऊन गेले.

एवढे सर्व होईपर्यन्त पोलिस स्वस्थच होते. तोवर दुपार झाली होती. सुमारे पाचशे किलो मीठ स्वयंसेवकांनी गोळा केले होते. सायंकाळी ते पोलिसांनी जप्त केले आणि ते निघून गेले. त्यांची पाठ फिरताच तेथे जमलेल्या आसपासच्या खेडु-तांनी आणखी मीठ गोळा केले आणि गावकऱ्यांत वाटले.

दांडीला गांधीजींनी मीठ कायद्याचा भंग करून सत्याग्रह केला, त्याच दिवशी सुरत जिल्ह्याच्या सागरकिनाऱ्यावरील अनेक गांवात शेकडो सत्याग्रहींनी कायदेभंग केला. त्यांना मार झोड झाली; अटक झाली.

६ एप्रिलला सायंकाळच्या दांडीच्या सभेत गांधीजी म्हणाले, 'सरकारने वास्तविक सर्वात प्रथम मला पकडायला पाहिजे होते. कारण मीच सर्वात मोठा अपराधी आहे.'

सकाळी सत्याग्रह संपवून निवासस्थानी गेल्यावर किना-ऱ्यावर उचलले मूठभर कच्चे मीठ गांधीजींनी साफ केले तेव्हा त्यांना दोन तोळे खाण्यालायक मीठ मिळाले. त्या मिठाच्या पुडीचा जाहीर सभेत लिलाव पुकारला. सोळाशे रुपयांना दोन तोळे गांधीमीठ लिलावात विकले गेले.

दांडी सत्याग्रहानंतर गांधीजी थांबले नाहीत. दांडीच्या आसपासच्या परिसरांतील गावोगावात सत्याग्रह प्रचार करीत सतत फिरत राहिले. शेकडो सत्याग्रहींसह आणखी दोन-तीन ठिकाणी त्यांनी पुन्हा मीठकायदा मोडला.

गांधीजींच्या सत्याग्रहामुळे सुरत जिल्ह्यात ठिकठिकाणी हजारोंचे सत्याग्रह झाले. आट व भीमराद येथील सत्याग्रह

विलक्षण प्रभावी झाला. गांधीजींच्या अहिंसेच्या संदेशाचे सत्याग्रहींनी तंतोतंत पालन केले.

छारवाडा गावी गांधीजी गेले तेव्हा 'नमक चोर की जय' च्या घोषणांनी लोकांनी त्यांचे स्वागत केले. गांधीजी हसून म्हणाले, 'महात्मा पेक्षा मला नमक चोर म्हणणे अधिक पसंत आहे. पण लक्षात ठेवा, मी चोरून मीठ कायद्याचा भंग केलेला नाही.' 'तुम्हीही उघडउघडपणे कायदा मोडा आणि त्याचे परिणाम भोगायला तयार राहा,' असा गांधीजींचा आदेश होता.

गांधीजींनी पुढचे पाऊल घोषित केले, 'आता मी सरकारी मीठ कारखान्यावर चढाई करीन.'

सुरत जिल्ह्यातील धारासणा येथील मीठ कारखान्यावर चढाई करण्याची योजना ठरली. चढाई अर्थातच अहिंसक होणार होती. पण गांधीजींचे हे पुढचे पाऊल निःसंशय आक्रमक होते.

आता सरकार स्वस्थ बसणे शक्य नव्हते. दांडी किनाऱ्यावर गांधीजींनी चिमूटभर मीठ उचलले आणि सारा देश पेटला. धारासणावरील गांधीजींच्या चढाईने त्या आगीत निश्चितच तेल ओतले जाणार होते.

गांधीजींची छावणी करादी या गावी होती. तारीख ४ एप्रिलला सत्याग्रहाच्या नियमाप्रमाणे चढाईची पूर्वसूचना देणारे पत्र गांधीजींनी रात्री पुरे केले आणि ते शांतपणे झोपी गेले.

त्या दिवशी रात्री १० पासून करादी छावणीच्या आसपासच्या आठ-दहा मैलांतील परिसरात सशस्त्र पोलिसांचे पहारे बसले होते.

रात्री पाऊण वाजता दोन पोलीस लॉऱ्या करादी छावणी पाशी आल्या. एका लॉरीत सुरत जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. ब्राहम, जिल्हा डी. एस. पी. व जिल्हा डी. वाय. एस. पी. हे गोरे अधिकारी आणि दुसऱ्या लॉरीत तीस सशस्त्र पोलिस होते.

सारी करादी छावणी गाढ झोपेत होती. गांधीजी आपल्या झोपडीच्या दारासमोर खाट टाकून झोपले होते. आजूबाजूला अनेक सत्याग्रहींचे बिस्तरे होते.

पोलिस लॉऱ्यांचा व पोलिसांच्या बुटांचा खाड् खाड् आवाज ऐकून काही सत्याग्रहींना जाग आली.

गांधीजी मात्र शांत झोपले होते.

सशस्त्र पोलिसांना घेऊन जिल्हा मॅजिस्ट्रेट व पोलिस अधिकाऱ्यांनी गांधीजींच्या खाटेला वेढा घातला आणि बॅट-रीच्या प्रकाशाचा झोत गांधीजींवर टाकला. गांधीजींना जाग आली. खाटेवर उठून बसत त्यांनी डि. मॅजिस्ट्रेट मि. ब्राहमला विचारले, 'तुम्ही माझ्यासाठी आला आहात काय?'

'मोहनदास करमचंद गांधी तुम्हीच काय?'

'होय, मीच.'

'मी तुम्हाला पकडायला आलोय.'

'तोंड धुवायला थोडा वेळ द्याल का?'

जि. मॅजिस्ट्रेटने अनुमति दिली.

लिंबाच्या काडीने दात घासता घासता गांधीजींनी विचारले, 'मि. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, मला कोणत्या आरोपाखाली पकडता आहात? माझ्या नावाचे पकड वॉरंट आणले आहे काय?'

खिशात हात घालून जि. मॅजिस्ट्रेटने वॉरंट काढले आणि ते गांधीजींपुढे केले.

'जरा वाचून दाखवता का ?'

डि. मॅजिस्ट्रेटने हुकुम वाचला. १०३ वर्षांपूर्वीच्या एका फौजदारी कायद्याप्रमाणे गांधीजींना पकडण्यात आले होते.

एव्हाना छावणीतील सारे सत्याग्रही गांधीजींभोंवती जमले होते.

हुकुम वाचून होताच गांधीजींनी डि. मॅजिस्ट्रेटला धन्यवाद दिले आणि म्हटले, 'मी तयार आहे. प्रार्थना करतो आणि तुमच्याबरोबर येतो.'

प्रार्थना झाली. खरेशास्त्रींनी ' वैष्णव जन तो ' भजनगीत म्हटले.

निघण्यापूर्वी गांधीजींनी आदल्या दिवशी व्हाइसरॉयना लिहिलेले आणि आणखी काही पत्रे एका स्वयंसेवकाच्या हाती दिली.

पोलिस अधिकारी घड्याळाकडे पाहू लागले. गांधीजींनी आपल्या पिशवीत सूत कातायची एक टकली, गीता व आश्रमभजनावली भरली.

जवळ उभ्या असलेल्या सशस्त्र पोलिस लॉरीत गांधीजी जाऊन बसले. एका स्वयंसेवकाने विचारले, 'बापू, माताजींना (कस्तुरबांना) काही सांगायचे आहे का ?'

'तिला मी काय सांगणार ? ती तर वीररमणी आहे.'

गांधीजींना घेऊन बरोबर १ वाजून १० मिनिटांनी पोलिस लॉरी नवसारी-वेडच्छी स्टेशनांच्या दरम्यान मध्येच एके ठिकाणी पोचली. थोड्याच वेळात मुंबईला जाणारी गुज-

रात मेल तेथे थांवली. ती निघाली व सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी मुम्बईजवळील बोरीवली स्टेशनच्या अलिकडे काही अंतरावर थांबली. भुऱ्या रंगाची सरकारी मोटारगाडी गांधीजींची वाट पाहात होती.

लेफ्टनंट कर्नल डॉ. राइसने गांधीजींची वैद्यकीय तपासणी केली आणि त्यांना मोटारीत बसविण्यात आले.

त्यावेळी दोन–चार गोरे वृत्तपत्रप्रतिनिधी सोडून कोणी नव्हते.

दांडी यात्रेच्या बंदिवान सेनापतीला घेऊन मोटर सकाळी साडेदहाच्या सुमारास पुण्याजवळील येरवडा कारागृहापाशी पोचली.

आणि गांधीजी स्थानबद्ध झाले–बेमुदत.

पोलिसांच्या स्वाधीन होण्यापूर्वी स्वयंसेवकाजवळ गांधीजींनी दिलेल्या पत्रात देशाला दिलेला त्यांचा संदेश सापडला. त्यात त्यांनी म्हटले होते,

‘ हे आंदोलन ज्या शुचितेने सुरू झाले त्याच शुचितेने ते पुढे चालू राहिले तर भारताला स्वराज्य मिळेल आणि जगापुढे एक आदर्श निर्माण होईल यात शंका नाही.

‘ त्यागाशिवाय मिळालेलें स्वराज्य फार काळ टिकणार नाही. माझ्या सहकाऱ्यांनी आणि जनतेने माझ्या अटकेमुळे विचलित होण्याचे कारण नाही. मी नव्हे, तर परमात्मा या आंदोलनाचे मार्गदर्शन करीत आहे.

‘ या विशाल, विराट भारताची प्रतिष्ठा या क्षणी मूठ भर मिठात सामाविलेली आहे. मूठ मोडली तरी मुठीतील मीठ पडता कामा नये.

‘ माझ्या देशबांधवांनी सहस्रावधींच्या संख्येने मीठ कायदा मोडावा, महिलांनी दारु दुकानांवर निरोधने करावी, विदेशी वस्तूंच्या व वस्त्रांच्या होळचा कराव्या, चरखा चालवावा, कोणाला अस्पृश्य मानू नये.

‘ हिंदु, मुस्लिम, शीख, पार्शी, ख्रिश्चन सर्व धर्मीयांनी हृदयाने एकत्र यावे.

‘ विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा–कॉलजे सोडावी, सरकारी नोकरांनी आपल्या नोकऱ्या सोडाव्या.

‘ हे सर्व झाले तर पूर्ण स्वराज्य आपण होऊन आपल्या दाराशी चालत येईल.’

देशाला सत्याग्रहाचा कार्यक्रम देऊन सेनापती गजाआड झाला.

आणि गांधीजींच्या चिमूटभर मिठाची आग हा हा म्हणता साऱ्या देशभर पसरली.

वायव्येकडील सरहद्द प्रांतापासून खाली मलबार (केरळ) पर्यंत आणि नैऋत्येस सिंधपासून ईशान्येस आसामपर्यंत

दांडी यात्रेपूर्वी व्हाईसरॉय आर्यविन उपरोधाने म्हणाले होते, हा म्हातारा ‘ म्हणे चिमूटभर मिठाने सरकार उलथून पाडणार आहे !’

पण गांधीजींच्या चिमूटभर मिठाने ब्रिटिश साम्राज्य सत्तेचा भक्कम पायाच खिळखिळा करून टाकला. साऱ्या देशातील सरकारी शासन यंत्रणा ठप्प झाली. इंग्रजीसत्तेचे भय भारतीय मनातून पार नाहीसे झाले.

गांधीजींच्या अटकेपूर्वीच हजारो लोक जेलमध्ये पोचले होते. गांधीजींना अटक होताच जणु देशात विजेचा संचार

झाला. गावन् गाव, शहरन् शहर पेटून उठले.

आंध्र, तामिळनाड, ओरिसा, गुजरात, महाराष्ट्र, सिंध, बंगालच्या हजारो मैलांच्या समुद्रकिनाऱ्यावरील गावागावात मीठ सत्याग्रहींच्या छावण्या लागल्या. तेथून हजारो सत्याग्रही मिठागारात घुसून मीठ लुटू लागले. लुटलेल्या मिठाचे कर-मुक्त मीठ बाजारात लिलाव होऊ लागले. स्त्री-पुरुष, समुद्राचे खारे पाणी डोक्यावरून आणून सागरकिनाऱ्यावर बेधडक मीठ बनवू लागले. जेथे समुद्र नाही तेथे खारी माती आणून ती कढईत पाण्यात उकळून मीठ बनवू लागले. गांधी—मिठाचे उघड बाजार गावोगाव भरू लागले. गांधीमिठाच्या पुड्या घरोघर विकल्या जाऊ लागल्या. हजारो लोकांनी इंग्लिश मीठ खायचे सोडून दिले.


शहरा-शहरात विदेशी वस्तूंच्या व कपड्यांच्या दुकानांवर, दारुगुत्त्यावर व विदेशी दारु दुकानांवरील पिकेटिंग (निरोधन) —मध्ये हजारो स्त्री-पुरुष आणि मुलेसुद्धा सामील होऊ लागली.

विदेशी कपड्यांवरील बहिष्कारामुळे कलकत्ता, मुंबई दिल्ली वगैरे शहरातील विदेशी कपडा बाजार बंद पडले. इंग्लंडच्या मँचेस्टर व लँकेशायर शहरातील कापड गिरण्यांना टाळे लागले. देशांतील विदेशी कापड व्यापाऱ्यांनी विदेशी कापड मागविणे बंद केले. खादीचा प्रचंड प्रचार झाला. घरो-घर चरखे फिरू लागले. दारुचे गुत्ते बंद झाल्यामुळे दारुचे सरकारी लिलावही कोणी घेईना. ताडीमाडीची लक्षावधि झाडे तोडण्यात आली. हजारोंनी दारु सोडली.

जुलुमी जंगल कायदे मोडून हजारो आदिवासींनी व खेडुतांनी आपली जनावरे चराईसाठी जंगलात घुसविली. अन्याय

जमीनसारा देणे शेतकऱ्यांनी बंद केले.

सरकारी बंदी हुकुमाचा भंग करून गांवोगाव सभा मिरवणुका, प्रभात फेऱ्या निघत होत्या. मुलांच्या वानरसेना, मांजरसेना आणि महिलांचे देशसेविका पथक धुमधडाक्यात व निर्भयपणे हजारोंच्या संख्येने त्यात भाग घेत होते. स्त्रियांची संख्या तर प्रचंड होती.



सशस्त्र सेनेशी सामना करावा तसा ब्रिटिश सरकारने नि:शस्त्र सत्याग्रहींचा अहिंसक लढा दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. लाठीमार, गोळीबार, बाँबवर्षाव, लष्करी जवान, सशस्त्र घोडेस्वार इत्यादी अस्त्र-शस्त्रांचा बेछूट वापर केला.

पण नि:शस्त्रांचे हे आंदोलन दडपण्यात शस्त्रधारी सरकार अयशस्वीच झाले.

असा हा भारतीयांचा नि:शस्त्र स्वातंत्र्य संग्राम १९३० तें ३४ पर्यंत चालू होता. सुमारे २ लाख लोक सक्तमजुरीची शिक्षा लागून तुरुंगात गेले. शेकडोंचे बलिदान झाले. हजारो जायबंदी झाले. कित्येक हजारांच्या जमिनी, घरेदारे जप्त झाली.

साऱ्या जगात या अभूतपूर्व संग्रामाने भारताचे नाव झाले. इतके दिवस 'तुच्छ गुलाम देश' म्हणून हिंदुस्तानला जग हिणवीत होते. आता 'आपल्या मुक्तिसाठी लढणारा शूरांचा देश' म्हणून भारताला जग ओळखू लागले.

□ □



विषय बाल-

# खारे पाणी पेटले

गांधीजींना पकडले, तरी धारासणावर चढाई करण्याचा त्यांचा संकल्प पुरा होणार होता. गांधीजींनी ८० वर्षांच्या वृद्ध जनाब तय्यबजींवर आणि सरोजिनी नायडूंवर आपल्या संकल्पपूर्तीचे काम सोपविले होते.

१२ मे हा चढाईचा दिवस ठरला. नेतृत्व करणार होते, जनाब तय्यबजी.

सरकारही तयार होते. धारासणा येथील दोन्ही सरकारी मीठ कारखान्यांवर तीन हजार सशस्त्र पोलिसांचा पहारा बसविण्यात आला. कारखान्याभोवती काटेरी तारांचे कुंपण घालण्यात आले.

ता. ११ मे ला तय्यबजींच्या हाती जिल्हा मॅजिस्ट्रेटचा ताकीदवजा हुकुम पडला. 'चढाई केलीत तर तो फौजदारी गुन्हा होईल आणि त्याचे परिणाम भोगावे लागतील. तेव्हा आपण

आपला चढाईचा निर्णय सोडून द्यावा.'

हुकुम वाचून तय्यबजींनी एवढेच म्हटले, 'मी माझा निर्णय बदलू शकत नाही.'

ठरल्याप्रमाणे १२ मे ला सकाळी तय्यबजी करादी सत्याग्रह छावणीतून ५१ सत्याग्रहींसह धारासणा कारखान्यावर चढाई करण्यासाठी पायी निघाले. त्यांच्याबरोबर दाऊदभाई सुलेमान, इमामसाहेब, करीमभाई व्होरा, अब्बास वरतेजा, गुलाम रसूल कुरेशी वगैरे अनेक प्रतिष्ठित मुसलमान सत्याग्रही म्हणून आले होते. आसपासचे हजारो खेडुत रात्रीपासून त्यांना निरोप देण्यासाठी जमले होते.

पदयात्रा सुरू होण्यापूर्वी प्रार्थना झाली. कस्तुरबा गांधींनी पदयात्रिकांना आशीर्वाद दिला, 'सरकारशी सामना करण्याची शक्ति परमेश्वराने माझ्या लेकरांना द्यावी.'

प्रार्थना संपताच कस्तुरबा गांधी, कमलादेवी चट्टोपाध्याय आदि शेकडो महिला आणि हजारो खेडुतांसह तय्यबजी करादी छावणीपासून निघाले.

थोड्याच अंतरावर त्यांच्या स्वागतासाठी जिल्हा मॅजिस्ट्रेट मि. ब्राहम आणि जिल्हा डी. एस. पी., तीनशे सशस्त्र पोलिस सात पोलिस लॉऱ्यांसह तयारच होते.

जिल्हा मॅजिस्ट्रेटने तय्यबजींना आडविले आणि परत फिरायला फर्माविले. 'तुम्ही मला व माझ्याबरोबरच्या सत्याग्रहींना हवे तर अटक करू शकता. तुम्ही वाटेल ते करा, आम्ही जाणार नाही.'

तेव्हा मग जि. मॅजिस्ट्रेटने सत्याग्रहींना विचारले, 'तुमच्यापैकी कोणाला परत जायचे आहे काय ?'

सर्व ५९ सत्याग्रहींनी एका आवाजात व एका वाक्यात गर्जना केली, ' कोणालाही जायचे नाही. आम्ही मागे हट- ण्यासाठी नाही, पुढे जाण्यासाठी आलो आहो.'

सत्याग्रहींमागे उभ्या असलेल्या हजारो खेडुतांनी गगन- भेदी स्वरात पोलिसांना आव्हान दिले, ' आम्हालाही पकडा. आम्ही पुढे जाणार आहो.'

तीनशे सशस्त्र पोलिसांनी तय्यबजी व ५९ सत्याग्रहींना घेराव घातला आणि गिरफ्दार केले.

त्यासरशी कस्तुरबा, कमलादेवी वगैरे महिला पुढे झाल्या आणि म्हणाल्या, ' आम्हाला का सोडता ? आम्हालाही पकडा.'

परंतु जि. मॅजिस्ट्रेटने त्यांना अटक करायला नकार दिला.

जनाब तय्यबजी व ५९ सत्याग्रहींना घेऊन पोलिस लॉरी जलालपुर पोलिस ठाण्याकडे निघाली. उपस्थित लोकसमुदायाने उंच स्वरात जयजयकार केला, ' म. गांधी की जय ', ' जनाब तय्यबजी की जय.'

मोटारीत चढताच उंच आवाजात तय्यबजींनी जनतेला आवाहन केले, ' बढे चलना, बच्चो ! आगे बढे चलना.'

जनाब अब्बास तय्यबजींनंतर तीनच दिवसांत सरोजिनी- देवी धारासणाच्या धारातीर्थात उतरल्या. त्यांनी गर्जना केली, ' विजय किंवा मृत्यु या निर्धाराने मी सत्याग्रहींच्या अग्रभागी राहून लढेन. मी स्त्री असले तरी स्वत:ला पुरुष समजून मी या स्वातंत्र्य आंदोलनात उतरले आहे.'

१५ मे च्या सूर्योदयाबरोबर सरोजिनीदेवी ५० सत्या- ग्रहींसह धारासणा मीठ कारखान्याकडे करादी सत्याग्रह छावणी-

तून निघाल्या. त्यांच्या व सत्याग्रहींच्या हातात धारदार मोठे विळे होते. कारखान्याभोवतीचे काटेरी तारांचे कुंपण कापून सत्याग्रही कारखान्याच्या आवारात प्रवेश करणार होते.

सरोजिनीदेवी व त्यांचे ५० सत्याग्रही अर्ध्या एक तासांत कारखान्याच्या जवळ पोचताच जिल्हा पोलिस सुपरिंटेंडेंटने शेकडो पोलिसांसह त्यांना आडविले आणि फर्मावले, 'तुम्हाला पुढे जाता येणार नाही.'

'मग आम्ही इथंच थांबणार. मागे फिरणार नाही.'

'तुम्ही थांबाल तितका वेळ आम्हीही थांबू. आमचाही सत्याग्रह', पोलिस अधिकारी हसून म्हणाला.

कोणीतरी खुर्ची आणून दिली. सरोजिनीदेवी तिच्यावर बसून पत्रे लिहू लागल्या. काही वेळाने टकलीवर सूत कातीत बसल्या.

डोक्यावर ऊन रणरणत होते. सत्याग्रहीही बैठक मारून शांतपणे बसून राहिले.

सशस्त्र पोलिसांची सेना आणि निःशस्त्र सत्याग्रहींचा दृढ निश्चय यांत तब्बल २८ तास सामना चालू होता. कोणीही जागचे हालायला तयार नव्हते.

त्यानंतर पोलिसांचा 'सत्याग्रह' निर्धार संपुष्टात आला. त्यांनी सरोजिनींना पकडण्याची धमकी दिली. पण पकडले मात्र नाही.

एकेका सत्याग्रहीला फरफटत रांगेतून बाहेर काढायला सुरुवात झाली. पण एकाला बाहेर काढले की मागोमाग दुसरा नवा सत्याग्रही त्याची जागा घेई.

सत्याग्रही गुडघ्यावर बसून कारखान्याच्या काटेरी कुंपणाकडे धाव घेण्याच्या संधीची वाट पाहात. संधि मिळताच पुढे सरसावत. पोलिस त्यांना लाठ्या–काठ्यांनी मागे रेटीत.

असे पूर्ण चार दिवस चालले होते. अडीचशे सत्याग्रहींना पोलिसांनी उचलले आणि जवळच्या तात्पुरत्या कैद्यांच्या तंबूत कोंबले.

हा खेळ किती दिवस करायचा ? सेनापती सरोजिनी देवींनी आज्ञा केली, 'हिंसा सोडून काय वाटेल ते करा आणि कुंपणातून घुसून मिठागरे ताब्यात घ्या.'

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या प्रार्थना सभेत सरोजिनींनी सत्याग्रहींना आवाहन केले, 'साऱ्या भारताची प्रतिष्ठा तुमच्या हातात आहे. गांधीजींचा देह तुरुंगात असला तरी त्यांचा आत्मा तुमच्याबरोबर आहे. जा, पुढे जा. तुम्हाला मार पडेल, पण तुम्ही हात उगारू नका.'

प्रार्थना संपताच सत्याग्रहींनी आपल्या रांगा केल्या. हातात कोयते आणि दोऱ्या घेतल्या. कारखान्याच्या दिशेने त्यांनी कूच केली.

बरोबर सकाळी ६–३० वाजता सत्याग्रहींची तुकडी मीठ कारखान्याच्या कांटेरी कुंपणापाशी घोषणा देत धडकली. कुंपणाच्या खांबावर ते उखडण्यासाठी त्यांनी दोर फेकताच पोलादाच्या टोकाच्या लाठ्यांनी पोलिस त्यांना सडकू लागले.

एकामागून एक लाठ्यांचे प्रहार पडत होते, पण एकही सत्याग्रहीने हात उचलला नाही की जागा सोडली नाही.

काही क्षणात शेकडो डोके फुटलेल्या, हाडे मोडलेल्या रक्तबंबाळ सत्याग्रहींच्या घायाळ देहांचा खच कुंपणाभोवती

पडला. त्यांच्या पवित्र रक्ताने भिजलेल्या मातीचे पट्टे सर्वत्र दिसू लागले.

आघाडीची तुकडी घायाळ होऊन जमिनीवर कोसळली की दुसरी तुकडी तिची जागा घेत होती. अशा एकामागून एक तुकड्या तारांच्या कुंपणावर धडका देत होत्या आणि पोलिसांच्या अमानुष हल्ल्याने हात, पाय, डोके फोडून घेऊन रक्ताच्या थारोळ्यात जमिनीला जवळ करीत होत्या.

देशसेविकांची शुश्रुषा पथके स्ट्रेचरवरून जखमींना काँग्रेस इस्पितळात घेऊन जात होती.

हजारो प्रेक्षक हे भीषण दृश्य बराच वेळ पहात होते. आता उघड्या डोळ्यांनी आपल्या नि:शस्त्र सत्याग्रही बांधवांवरील निर्दय पोलिसी अत्याचार निमूटपणे पहाणे त्यांना अशक्य होऊ लागले. त्यांच्यापैकी अनेक लोक स्वयंसेवकांची साखळी तोडून पोलिसांच्या दिशेने धावण्याचा प्रयत्न करू लागले. मोठ्या मुश्किलीने नेत्यांनी त्यांना आवरले. सशस्त्र पोलिस हातातील रायफली रोखून गोळ्या घालण्याची धमकी देत होते.

हाडे मोडली, डोकी फुटली, तरी सत्याग्रही कुंपणापासून हालत नाहीत हे पाहाताच पोलिसांनी त्यांच्या तंगड्या किंवा हात धरून फरफटत ओढून एकेकाला दूर फेकून द्यायला किंवा जवळच्या खाऱ्या पाण्याच्या डबक्यात बुडवायला सुरुवात केली.

अशी ही लढाई तासन् तास चालली होती.

अखेर पोलिस हरले. त्यांनी सेनापती सरोजिनीदेवींना अटक केली आणि तारेच्या कुंपणाने वेढलेल्या तात्पुरत्या तुरुंगात अडकविले.

## सर्वांत भीषण दिवस

२१ मे, १९३०. धारासणा येथील सरकारी मीठ कारखान्यावरील सत्याग्रही चढाईतील सर्वांत भीषण दिवस. त्या दिवशीच्या चढाईचे सेनापती होते जनाब इमामसाहेब तय्यबजी. ६२ वर्षांचे. उमदा मुसलमान पुढारी. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहांत गांधीजींच्या खांद्याला खांदा भिडवून लढलेला त्यांचा एकनिष्ठ सहकारी. त्यांच्याबरोबर गांधीजींचे दोन शिष्य होते – प्यारेलाल व गांधीजींचे चिरंजीव मणिलाल गांधी.

चढाई यशस्वी करण्याच्या निर्धाराने सत्याग्रही उभे होते, तर पोलीस चढाई चेचून काढण्याच्या निश्चयाने आले होते.

देशाच्या विभिन्न प्रांतांतून आणि गुजरातच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतून २५०० सत्याग्रही आदल्या एक–दोन दिवसांत धारासणाच्या रणक्षेत्रावर पोचले होते. सर्वांचा मुक्काम धारासणाजवळच्या उंटाडी गांवच्या सत्याग्रह छावणीत होता.

सत्याग्रही व सरकारी गोरे-काळे पोलीस हे दोन्ही पक्ष रणक्षेत्रावर आमने सामने तळ ठोकून होते.

२१ मेची पहाट झाली. प्रार्थना झाली. एका सत्याग्रहीने खरेशास्त्री म्हणत असत ते गांधीजींचे आवडते गीत म्हटले,

शूर संग्राम को देख भागे नहीं<br>
देख भागे सोई शूर नहीं – –

शेवटी भजन झाले –

रघुपति राघव राजाराम<br>
– – – – – – –

ईश्वर अल्ला तेरो नाम

\- - - - - - -

आणि सर्व सत्याग्रहींनी गांधीजींच्या सत्याग्रह संदेशाचे स्मरण केले–

'या क्षणी हिंदुस्तानची प्रतिष्ठा व सारसर्वस्व चिमूट-भर मिठात साठवलेले आहे. कोणाही सत्याग्रहीने एकदा हस्त-गत केलेले मीठ गमावता कामा नये. मनगट मोडले तरी हरकत नाही पण मिठाची मूठ उघडता कामा नये.'

सकाळी झेंडावंदन झाले आणि 'वंदेमातरम्', 'म. गांधी की जय' घोष करीत अडीच हजारांचा तो प्रचंड शुभ्र खादी-धारी सत्याग्रही जत्था रणक्षेत्राकडे निघाला.

उजाडते न उजाडते तोच लाठीबंद पोलीसांसह पोलीस अंमलदार रणक्षेत्रावर मोक्याच्या जागी पवित्र्यात उभे होते.

तो युद्धप्रसंग पाहाण्यासाठी हजारो खेडुत आणि शहरी लोक रणमैदानाभोवती उभे होते. न्यू फ्रीमन या अमेरिकन नियतकालिकाचे वार्ताहर वेब मिलर आणि मध्यवर्ती कायदे-मंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन नुकतेच बाहेर पडलेले विठ्ठलभाई पटेल मुद्दाम आले होते.

मिठागार चोहोबाजूंनी तारेच्या कुंपणाने वेढलेले होते. कुंपणाबाहेर लाठीबंद पोलिसांच्या तुकड्या सभोवती उभ्या होत्या. पोलिसांपासून काही अंतरावर अडीच हजार सत्या-ग्रहींच्या तुकड्यांच्या अनेक रांगा हाती तिरंगा ध्वज घेऊन सज्ज होत्या.

बिगुल वाजला. 'वंदेमातरम्' व 'म. गांधी की जय' चा आकाश भरून टाकणारा घोष सुरू झाला.

इमामसाहेब, प्यारेलाल व मणिलाल गांधी एक सत्याग्रह तुकडी घेऊन आघाडीवर उभे होते.

त्यांच्या व इतर तुकड्यांतील सत्याग्रहींच्या हातातील तिरंगा उंच फडकू लागला.

पुन्हा बिगुलचा आवाज निनादला. पाठोपाठ जोरात शंखनाद घुमला.

त्यासरशी पोलिसांची फळी फोडून पहिली तुकडी तारांच्या कुंपणातील मिठाच्या राशींचा ताबा घेण्यासाठी धावली. लाठी-बंद पोलीस तिच्यावर गिधाडांसारखे तुटून पडले. लाठ्यांचे जीवघेणे तडाखे सत्याग्रहींच्या डोक्यावर, अंगा–पाठीवर ताड-ताड पडू लागले. सत्याग्रही घायाळ होऊन खाली कोसळत, रक्तबंबाळ होत, पण एकजण जागा सोडत नव्हता. पोलिसांवर उलटून हात उचलीत नव्हता.

कारण गांधीजींचा त्यांना संदेश होता, 'सरकारचा अन्याय्य कायदा मानू नका आणि मारूंही नका.' मानेंगे नहीं मारेंगे भी नहीं !

पहिल्या तुकडीवरील भीषण लाठीमाराचा काहीही परि-णाम झाला नाही. एकामागून एक तुकड्या मिठागरावर चाल करून येत होत्या. 'इतके बडविले तरी ऐकत नाहीत काय ?' असे दातओठ खात म्हणत लाठीधारी पोलीस सत्याग्रहींवर बेफामपणे लाठीवर्षाव करीत होते.

त्याला न जुमानता आणि पोलिसांना चकवून अनेक सत्याग्रही काटेरी कुंपणावरून उड्या टाकून मिठागरांत घुसत होते. मिठागारांच्या राशींवर झेंडा रोवून तो एका हाताच्या मुठीत घट्ट पकडून आणि दुसऱ्या हाताच्या मुठीत मीठ घेऊन

निर्धाराने उभे होते. पोलिसांची मग धावपळ होत होती. सत्याग्रहींमागोमाग मिठागरात घुसून ते त्यांची डोकी सडकत होते. मनगटावर लाठ्या हाणीत होते. पण सत्याग्रहींची झेंड्यावरील मुठीची पकड सुटत नव्हती की मिठाने मिटलेली मूठ उघडत नव्हती.

काही पोलिसांनी तर निर्दयपणाची व निर्लज्जपणाची कमाल केली. त्यांनी सत्याग्रहच्यांना लाठ्या हाणून खाली पाडले. त्यांच्या शरीराच्या नाजुक गुप्तांगावर वर्मी तडाखे मारले. ढुंगणात लाठ्यांची टोके खुपसली. काहींनी सत्याग्रहींची गुप्तेंद्रिये हातांनी जोराने बेहोष होईपर्यंत पिरगळली.

काही सत्याग्रहींच्या अंगावरील खादीचे कपडे उतरवून त्यांना नागवे करण्यात आले आणि त्यांच्या उघड्या अंगावर सपासप लाठ्या हाणण्यात आल्या.

लाठ्यांच्या बेसुमार तडाख्यांनी सत्याग्रही बेशुद्ध होऊन, रक्तबंबाळ होऊन पडत होते. ज्येष्ठाच्या भयानक उन्हात जमिनीवर तळमळत होते. 'पाणी पाणी' करीत होते. रेड-क्रॉसचे व काँग्रेस इस्पितळाचे महिला स्वयंसेवक घायाळ सत्याग्रहींना घेऊन जाण्यासाठी पुढे झाले. तेव्हा त्यांना मनाई करण्यात आली. काहींना तर पोलीसी लाठ्यांचा प्रसादही मिळाला.

शेकडो सत्याग्रही जखमी अवस्थेत कित्येक तास पडून होते. शेवटी पोलिसांनी त्या अवस्थेतही त्यांच्या पायात बेड्या ठोकल्या आणि ढोरांप्रमाणे फरफटत नेऊन त्यांचे अर्धचेतन देह काटेरी झुडुपात किंवा खाऱ्या पाण्यात फेकून दिले.

तरीही एका मागून एक सत्याग्रहींच्या लाटा काटेरी कुंपणाला धडक देण्यासाठी धावत येत होत्या. पोलीस त्यांचा

पाठलाग करून त्यांना जमिनीवर लोळवीत होते.

इतक्यात पोलिसांचा बिगुल वाजला आणि गोरे घोडेस्वार आपले अरबी घोडे फेकत आणि तोंडाने अर्वाच्य शिव्या देत मैदानांत घुसले. स्वयंसेवक जमिनीवर पालथे झाले. घोडयांच्या टाचांखाली त्यांची शरीरे चेचली जाऊ लागली. पण कुणी हाय म्हटले नाही की कळवळून उठले नाही.

तरीही काही सत्याग्रही कुंपणाच्या दिशेने पळू लागले. ते पळत असल्याचे दिसताच दुसऱ्या काहींना अधिकच चेव आला. ते निर्धाराने घोडयांच्या टाचाखाली चेंगरत जमिनीला खिळून राहिले.

काही सत्याग्रहींनी घोडेस्वारांवर मात केली. समोरून स्वार येत असल्याचे दिसताच त्यांनी जमिनीवर लोळण घेतले. घोडे जवळ येताच घोडेस्वाराच्या मार्गापासून लोळतच शिताफीने असे दूर झाले की घोडे त्यांच्या अंगाला घासून गेले, पण एकजण त्यांच्या टापांखाली सापडला नाही. घोडे उडया मारून गेले. ते सत्याग्रही पुन्हा उठले आणि कांटेरी कुंपणाच्या दिशेने धावत सुटले. पोलिस त्यांच्यामागे धावले. पण त्यांच्या पकडीत न सापडता अनेकांनी कुंपणावरून उडया मारून मिठागरांत प्रवेश मिळविला.

या निर्णायक लढाईसाठी निघालेल्या सत्याग्रहींचे जथ्थे येतच होते. लाठयांनी त्यांची डोकी सडकून झाली. शरीराची धिरडी करून झाली. त्यांचे रक्त सांडून झाले. तरीही सत्याग्रहींचा धैर्यमेरू ढासळत नव्हता. एक नव्हे, दोन नव्हे तर दोनशे नव्वद सत्याग्रही जखमी झाले होते. गुजराथचे सत्याग्रही भाईलाल भाई व महाराष्ट्राचे बाबू होले हे शहीद झाले. आता काय करावे ?

पोलिसांना मोठा पेच पडला. गोळ्या झाडाव्या काय?

पण तसा हुकूम नव्हता. सत्याग्रहींना पकडण्याचाही हुकूम नव्हता आणि पकडायचे तरी किती जणांना? त्यांना ठेवायचे कुठे? म्हणून मारून, पिटून त्यांना पिटाळण्याचे धोरण होते.

अखेर सायंकाळी सत्याग्रहाचे नेते इमामसाहेब, प्यारेलाल व मणिलाल गांधींना अटक केली आणि त्या दिवशीचा १ मेचा सत्याग्रह संपला.

रोज सत्याग्रह होतच होता. संपूर्ण देशातून आणि विशेषतः गुजरात, महाराष्ट्र, मुंबईतून शेकडो सत्याग्रही येऊन धारासणाच्या रणकुंडात आपल्या समिधा टाकीत होते.

१ जूनचा सत्याग्रह. त्या दिवशी तर २१ मेच्या निर्दय-पणाला व निलाजरेपणालाही लाजवील असा बेगुमान निर्दयपणा व निर्लज्जपणा काळ्या–गोऱ्या शिपायांनी दाखविला.

एका सत्याग्रहीला एका गोऱ्या सार्जंटने नागवे केले. त्याच्या गुदद्वारांत आपला दंडा घुसविला. वेदना असह्य झालेल्या त्या सत्याग्रहीने सार्जन्टला दूर ढकलले, पण त्या पिशाच्चाने सत्या–ग्रहीला पुन्हा खाली पाडून तोच निर्दय व बेशरम प्रकार परत केला. अनेक सत्याग्रहींच्या निम्नांगावर दंडयाचे प्रहार केले. इतके जबरदस्त की सत्याग्रही कायमचे नपुंसक व्हावेत. एका सत्याग्रहीच्या शरीरात तर कांटे घुसविण्यात आले. दुसऱ्या एकाला लाठ्यांचे चाळीस तडाखे देण्यात आले. तो मूर्च्छित होऊन खाली कोसळला. त्याला फरफटत नेऊन एका गोऱ्या सार्जन्टने त्याच्या तोंडात मीठ कोंबले आणि मिठागरातील मिठाच्या पाण्यांत एकदा नव्हे, दोनदा नव्हे, तर वीस वेळा

डुबकी दिली. शेवटी त्या सत्याग्रहीला बेशुद्धावस्थेत इस्पितळात पोचविण्यात आले. तीन तासांनी शुद्धीवर आल्यावर गोऱ्या शिपायाने त्याला विचारले, 'तुला घरी जायचे आहे की पुन्हा सत्याग्रह करायचा आहे ?' सत्याग्रहीचे निर्धारपूर्वक उत्तर आले, 'मी पुन्हा सत्याग्रह करणार आहे!'

अखेर लष्कराला पाचारण करण्यात आले. त्याने धारासणाकडे येणारे चोहोबाजूंचे रस्ते बंद केले. शेवटी उंटाडी येथील सत्याग्रह छावणी उध्वस्त केली तेव्हांच सत्याग्रह थांबला.

असे हे गुजरातमधील धारासणाचे धारातीर्थ.

**वडाळा**

इकडे महाराष्ट्रात मुंबईजवळच्या वडाळाने आणि रत्नागिरीतील शिरोडाने मीठ सत्याग्रहाचे मैदान गाजवून इतिहासात आपले नाव अजरामर केले.

वडाळ्याच्या सरकारी मीठ गोदामावर २२ मे पासून चढाई सुरू झाली. वडाळ्यांत धारासणासारखेच भीषण दृश्य दिसत होते. पोलीस व सत्याग्रही निकराने एकमेकांवर मात करायचा प्रयत्न करीत होते.

पण १ जूनच्या वडाळा सत्याग्रहासारखी लढाई मीठ सत्याग्रह आंदोलनात देशाने कुठेच पाहिली नाही.

त्यादिवशीची लढाई शेदोनशे सत्याग्रहींची नव्हती. सत्याग्रही सैनिक आणि त्यांचे सहानुभूतिदार नागरिक मिळून पंधरा हजार लोकांचा विशाल जमाव वडाळा मिठागारावर चढाई करण्यासाठी १ जूनला सकाळी आला होता.

खादीच्या केशरी साड्यांतील हजारो देशसेविका 'शुद्ध

सुंदर अति मनोहर मंत्र वंदेमातरम्' आदि राष्ट्रीय गीते गात शिस्तीने चालल्या होत्या. शेकडो मुसलमान व पार्शी सत्याग्रही व नागरिक 'वंदे मातरम्' व 'महात्मा गांधी की जय' च्या घोषणांत त्या प्रचंड मिरवणुकीत निर्धाराने चालले होते. शेकडो लहान लहान लेकरांची वानरसेना आपले चिमुकले कोवळे हात हवेत उडवीत कोवळ्या आवाजात घोषणा देत होती.

त्या दिवशीची लढाई पहायला मुंबई सरकारचे गृहसचिव हॉटसन स्वत: जातीने हजर होते.

मिठाच्या गोदामाभोवती शेकडो पोलिसांचे कडे होते. ते फोडून वानरसेना, देश सेविकांची सेना, शेकडो सत्याग्रही आत घुसले. चिखल तुडवीत रणरणत्या उन्हात मिठाच्या खाचरांपर्यंत सर्वजण पोचले. हिंस्त्र श्वापदाप्रमाणे त्या शेकडो नि:शस्त्र स्त्री–पुरुष–मुलांवर पोलीस तुटून पडले. लाठ्यांचे प्रहार होऊ लागले. तरीही सत्याग्रही खाचरात घुसून मीठ उचलून पोलिसांना चकवून कुंपणाबाहेर पळत होते. थोड्याच वेळात शेकडो सत्याग्रहींनी व त्यांच्या बरोबरच्या हजारो नागरिकांनी रणक्षेत्र सर केले.

पुन्हा लाठ्यांचे तडाखे, डोकी फुटताहेत, हातपाय मोडताहेत, सत्याग्रही जमिनीवर कोसळताहेत, परंतु सत्याग्रही हरले नाहीत की भ्याले नाहीत. दीडशेवर सत्याग्रही जखमी होऊन पडले. पण सत्याग्रही सेना मागे हटेना.

पोलिसांना काही केल्या लोक आवरेनात. तेव्हा त्यांच्या मदतीला लष्कर आले आणि लष्करी घोडेस्वार सत्याग्रही जमावाला बेदरकारपणे घोड्यांच्या टापांखाली तुडवीत बेलगाम-

पणं दौडत सुटले.

तरीही सत्याग्रही परत उठून मिठाच्या खाचराकडे धावत होते. पोलीस त्यांच्या मागे. असा हा खेळ बराच वेळ चालला. शेवटी धरपकड सुरू झाली. हजार सत्याग्रहींना पकडले आणि गुरे हाकलतात तसे वरळी तुरुंगाकडे हाकलत हाकलत नेले.

त्यावेळचा वरळीचा तुरुंग म्हणजे तारांची कुंपणे घालून केलेला भला मोठा गुरांचा कोंडवाडाच. ना अन्न–पाणी किंवा नीट निवारा. त्यात त्या चार हजार सत्याग्रहींना कोंडले.

सत्याग्रही ओरड करूं लागले. ते आता राजबंदी झाले होते. सरकारी पाहुणे झाले होते. हक्काने अन्न–पाण्याची मागणी करू लागले. एवढ्या प्रचंड संख्येला द्यायला जेल अधिकाऱ्यां-पाशी अन्न तर नव्हतेच; पण पाणीही नव्हते. त्यांच्यापाशी होत्या फक्त पोलिसी लाठ्या. सत्याग्रही हट्टाला पेटले. प्रक्षुब्ध झाले. पोलिसांनी त्यांना झोडपायला सुरवात केली. सत्याग्रहींनी प्रतिकार आरंभला. चांगलीच जुंपली. नव्वद सत्याग्रही घायाळ झाले. पंचवीस तर मरणाच्या उंबरठ्यात पडले. परिस्थिति पोलिसांना आवरेना. तेव्हा लष्कर बोलविले. लष्करी शिपायांनी सत्याग्रहींची अमानुष ससेहोलपट केली.

तुरुंगाबाहेर हजारोंचा जमाव जमला होता. तो चवताळला. तुरुंगावर धावून जाण्याच्या पवित्र्यात उभा राहिला. लष्करी घोडेस्वार जमावावर चाल करून गेले. निर्दयपणे घोडे फेकीत लोकांना तुडवीत आणि लाठ्यांनी ठोकीत थैमान घालू लागले. स्त्रिया व मुले यांचीही त्यांनी गय केली नाही.

असा हा वडाळ्याचा रणसंग्राम आणि पोलिसी–लष्करी दडपशाही.

वडाळा युद्धभूमीजवळच्या एका टेकडीवरून लंडनच्या ' डेली हेराल्ड ' दैनिकाचे इंग्रज प्रतिनिधी जॉर्ज स्लोकोम सर्व दृश्य पाहात होते. निशस्त्र सत्याग्रहींवरील अत्याचार पाहून स्लोकोम उद्‌गारले, ' मी इंग्रज आहे याची मला शरम वाटते.'

## शिरोडा

शिरोडा– सिंधुदुर्ग (रत्नागिरी) जिल्ह्याच्या दक्षिण टोकाचे एक छोटेसे आडवळणी सागरी गाव. मिठाचे आगर.

१९३० साली शिरोड्याचे भाग्य अकस्मात उजळले. सबंध हिंदुस्तानात गावाची कीर्ती पसरली. साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष त्या सालच्या मे महिन्यात शिरोड्याकडे लागले होते.

अशा या शिरोडा गांवात व तमाम महाराष्ट्रात मे, १९३० च्या पहिल्या आठवड्यात एक जाहिरात वाटण्यात आली. जाहिरातीत लिहिले होते –

' महाराष्ट्रातील मिठाच्या सत्याग्रहाचा अखेरचा निकराचा संग्राम शिरोडे येथे लढण्याचे महाराष्ट्र कायदेभंग मंडळाने आता मुक्रर केले आहे.

' सर्व महाराष्ट्रातील शेकडो निवडक स्वयंसैनिक येथे तळ देऊन बसले आहेत.

' येथे अनेक मिठागरे असून त्या मिठागरांतील मीठ सरकारी कर न भरता सत्याग्रहाने बाहेर काढावे व त्या प्रयत्नांत आपले बलिदान करावे लागले तरी करावे अशा निर्धाराने हा लढा पावसाळ्याच्या प्रारंभापर्यंत ता. १२ ते २२ पर्यंत चालू राहणार आहे.

'सरकारच्या अन्याय्य व जुलमी मिठावरील करापासून लोकांची मुक्तता व्हावी म्हणून सत्याग्रही लोक आगरातील मीठ सरकारच्या पहाऱ्याला न जुमानता बाहेर काढणार आहेत.'

६ एप्रिल १९३० ला गांधीजींनी दांडी या खेड्याच्या सागर किनाऱ्यावर मूठभर मीठ उचलून सरकारचा जुलमी 'नमक का कानून तोड दिया.'

आणि महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, कुलाबा व रत्नागिरी हे सागरी जिल्हे आघाडीवर आले. हातात बादल्या, डबे किंवा डोक्यावर मातीचे घडे घेवून हजारो स्त्री-पुरुष, मुले, समुद्रावर जात आणि बादल्या, घड्यात खारे पाणी भरून घेऊन येत होती, स्टोव्ह किंवा चुलाड्यावर पाणी उकळून मीठ तयार करीत होती, कर न देता विकत होती आणि सरकारच्या मीठ कराला आव्हान देत होती.

आंदोलनाच्या महाराष्ट्रातील नेत्यांनी चढाईसाठी शिरोडा मिठागरांची निवड केली.

तुकड्या-तुकड्यांनी मिठागरांवर आक्रमण करायचे, तेथील मीठ लुटायचे आणि ते सरकारी कर न भरता विकायचे किंवा गरिबांना वाटायचे असा कार्यक्रम ठरला.

शिरोड्याच्या रणसंग्रामाची तयारी जोरांत सुरू झाली. गांधीजींचे आणि कॉंग्रेसचे नांव महाराष्ट्रात खेडोपाड्यांत पोचले होते. जिल्ह्याजिल्ह्यांतून शेकडो सत्याग्रही शिरोड्याला जायला तयार झाले. हजारो रुपयांचा सत्याग्रह निधि जमू लागला. ठिकठिकाणी सत्याग्रहींच्या छावण्या स्थापन झाल्या. शिबिरे सुरू झाली.

युद्धमंडळे निघाली, सेनापती नियुक्त झाले. शिरोड्याचा रणसंग्राम आगळा वेगळाच होता. मिठागरावर चढाई करायची पण ती शांतिपूर्ण, अहिंसक. मीठ लुटायचे परंतु दंगामस्ती न करता. सरकारचे पोलीस स्वस्थ बसणार आहेत थोडेच? ते आडवे आले तर प्रतिकार करायचा नाही. पोलिसांनी काठी उगारली तर मार खायचा, गोळ्या झाडल्या तर छातीवर झेलायच्या.

शिरोड्याला सत्याग्रहींची परीक्षा होणार होती.

मुंबईतील विलेपार्ल्याला सत्याग्रहींची प्रचंड छावणी पडली होती. तारीख ८ मे रोजी सकाळी ६-३० वाजता शंभर-सैनिकांची पहिली तुकडी पार्ल्याच्या छावणीतून शिरोड्याकडे निघाली. निरोप समारंभ झाला. जानकीबाई बजाजनी सैनिकांना आवाहन केले, 'या अहिंसक युद्धात तुमच्या शौर्यधैर्याची कसोटी आहे. तुम्ही तिला उतराल असा विश्वास आहे.'

१२ मे पासून मिठागरांवरील चढाईला प्रारंभ होणार होता. आदल्या दिवशी संध्याकाळपर्यंत मुंबईच्या बोटींनी एकूण ५८३ सत्याग्रही वेंगुर्ले बंदरात उतरले.

जनतेने त्यांचे उत्साहानें स्वागत केले, अतिथ्य केले.

५८३ सत्याग्रहींचा प्रचंड जथा शिरोड्याला पोचला तेव्हा महात्मा गांधींच्या जयजयकाराने आकाश दुमदुमून गेले. गांवच्या माऊली मंदिराच्या आवारांत सत्याग्रहींची छावणी होती.

महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांतील आणि मुंबईतील सत्याग्रही प्रथमच एकत्र आले होते. पूर्व खानदेश (जळगांव) जिल्ह्यांतील व मुंबईमधील सत्याग्रही सर्वांत जास्त होते. प्रत्येकी १०३.

सत्याग्रहींच्या आगमनाने शिरोड्यात आणि आसपासच्या परिसरांत विलक्षण उत्साह व चैतन्य निर्माण झाले होते. उद्या १२ तारखेला काय होणार? भीतियुक्त कुतुहल वातावरणात वावरत होते.

कारण चारच दिवसांपूर्वी सरकारी अधिकाऱ्यांनी जाहिराती वाटून मिठागर मालकांना व आंदोलकांना 'जाहीर समज' दिली होती–

'जो कोणी जकात न देता मीठ पसार करील तो हिंदुस्तान सरकारच्या सन १८८२ च्या मिठासंबंधी कायद्यान्वये गुन्हेगार होईल. हा गुन्हा करणाऱ्याला किंवा त्याला मदत करणाऱ्याला ५०० रु. दंड किंवा सहा महिने तुरुंगवास अथवा दोन्ही शिक्षा कायद्यात सांगितलेली आहे.

'सर्व मिठागरांचे मालक व मक्तेदार यांचे आपल्या मिठागरात मिठाच्या कायद्याविरुद्ध कसलेही कृत्य घडत नाही, हे पाहण्याचे कर्तव्य आहे. सदर कर्तव्यास ते चुकतील तर त्यांच्यावर खटला भरण्यास, इतकेच नव्हे तर त्यांचे मिठागर बंद करण्यास ते पात्र होतील.'

या धमकीचा सत्याग्रहींवर परिणाम होणे शक्यच नव्हते. मिठागर मालक सत्याग्रहींना सामील होते. त्यांनीही सरकारच्या धमकीला भीक घातली नाही.

प्रत्येकी दहा–दहाच्या ५४ सत्याग्रही तुकड्या सत्याग्रही संग्रामासाठी सिद्ध झाल्या. प्रत्येक तुकडीचे वैशिष्ट्यपूर्ण नाव होते– समर्थ, बजरंग, महात्मा, अजमल, अकबर, छत्रपती, अहिंसा, रणगर्जना, स्वातंत्र्य, मीठचोर वगैरे.

तुकडीला एकेक नाईक होता. सर्व सत्याग्रही तुकड्यांचा सेनापती होता– ना. म. गोखले. गोखले यांचे सहकारी होते धर्मानंद कोसंबी, पंडित, डॉ. भागवत, डॉ. लागू, विनायकराव भुस्कुटे, डॉ. आठल्ये वगैरे.

१२ मे ला सकाळी उजाडताच ७० सत्याग्रहींचा पहिला जथा अप्पासाहेब नावर यांच्या मिठागराकडे निघाला.

मिठागरावर सत्याग्रही पोहोचले. परंतु तेथे तर पोलिसांचा खास असा बंदोबस्त दिसतच नव्हता. कस्टमखात्याचे नेहमीचे फक्त दोन शिपाई होते.

सेनापतीने मीठ लुटण्याचा हुकुम देताच वंदेमातरमचा जयजयकार करीत सत्याग्रही आगरांत घुसले. एकेका राशीचा ताबा घेतला आणि राष्ट्रीय झेन्डा रोवला.

बिचारे दोन शिपाई घाबरले. एक तर रडूच लागला.

इतक्यात पोलीस व त्यांचे अधिकारी पोचले. सर्व सत्याग्रहींना पकडल्याचे त्यांनी जाहीर केले. पण पोलीस फौजदार गणवेषात नव्हते. पुढाऱ्यांनी आक्षेप घेतला, 'तुमचा हुकुम आम्ही मानीत नाही. तुम्ही पोलिस अधिकारी कशावरून? गणवेष कुठे आहे?'

फौजदार तणतणत निघून गेले.

आदल्या दिवशीसारखाच पुन्हा कार्यक्रम मिठागरावर घडला. एक तुकडी हल्ला करायची, पोलिस तिला पकडून ताब्यात घ्यायचे, त्यामागे दुसरी तुकडी हजर. मिठागराचे कुंपण तोडून सत्याग्रही आत घुसायचा प्रयत्न करायचे. पोलिस त्यांना बदडून आडवायचे.

मग सेनापतीने युद्धाचे तंत्र बदलले. एकदम दोन चार

आगारांवर बरेचसे सत्याग्रही पाठवायचे. तिकडे पोलिस धावले की इकडे अगदी अनपेक्षित आगरावर हल्ला चढवायाचा.

पोलिसांची एकच धांदल उडाली. त्यामुळे सुमारे ५०० मण मीठ लुटण्यात सत्याग्रही यशस्वी झाले.

ता. १३ मे या दुसऱ्या दिवशी १५३ सत्याग्रही व त्यांच्या पुढाऱ्यांना पकडले.

तिसऱ्या दिवशी १४ मेला पोलिसांनी जबरदस्त मारहाण करावयास सुरुवात केली. सत्याग्रहींना तंगड्या धरून फरफटत नेले. उचलून जमिनीवर आदळले, पाठीवर व छातीवर गुद्दे हाणले. थोबाडावर ठोसे मारले, लाठ्यांचे तडाखे लगावले.

तरी देखील सत्याग्रही मागे हटले नाहीत की त्यांनी पोलिसांवर हात टाकला नाही.

शिरोडा रणसंग्रामातील चौथा दिवस १५ मे चिरस्मरणीय ठरला.

सत्याग्रही कोणत्याही दिव्याला तयार होते.

कोसंबी व सोमण यांच्या नेतृत्वाखाली दुपारी २।। वाजता ११–११च्या चार तुकड्या म. गांधींच्या जयघोषात मिठागराकडे निघाल्या वाटेत खुद्द कलेक्टर त्यांना सामोरे आले आणि कोसंबींना बजावले,

'तुम्ही मुकाट्याने परत जा. नाहीतर पुढील सर्व प्रकाराची जवाबदारी तुमच्यावर राहील.'

सेनानी कोसंबींनी कलेक्टरचा हुकूम अव्हेरला आणि सत्याग्रहींना पुढे जाण्याची आज्ञा दिली.

हजारो अस्वस्थ प्रेक्षक शांतपणे ते भयंकर दृश्य पाहात होते.



खाकी पोशाख केलेल्या लाठीबंद पोलिसांच्या रांगाच्या रांगा उभ्या आहेत. हत्यारी पोलीसांची वागनेटे ठिकठिकाणी तळपत आहेत. पोलिसांना चकवून सत्याग्रहींच्या रांगा भरभर आगरात घुसण्याचा प्रयत्न करीत आहेत. पोलिस त्यांच्यावर तुटून पडत आहेत, त्यांना लोळवित आहेत. लाठ्यांचे तडाखे हाणीत आहेत.

सेनापती गोखल्यांनी राखीव म्हणून ठेवलेले सर्व सत्याग्रही मैदानात उतरविले आणि अखेरचा निकराचा संगर सुरू झाला. प्रत्येकी ११ सत्याग्रहींच्या १० तुकड्या मैदानात आल्या होत्या.

सेनापती गोखले अगदी विनीच्या तुकड्यांनिशी पुढे चाल करून गेले. कलेक्टरनी त्यांना आडविले. गोखले यांच्या दोन्ही बाजूंची दोन पथके वेगवेगळ्या दिशेने चाल करून गेली. पोलिसांची धांदल उडाली.

पोलिसांच्या रांगा तोडून सत्याग्रही मिठाच्या राशीकडे धावत होते.

'महात्मा गांधी की जय',

'सत्याग्रहाचा विजय असो'

–अशा घोषणा देत कुलकर्णी नावाचा एक शूर सत्याग्रही कुंपणावरून उडी घेऊन मिठागरात घुसला.

संतापाने पोलिस बेभान झाले. हिंस्त्र श्वापदासारखी त्यांनी कुलकर्णीवर झडप घातली. त्याला जमिनीवर लाठ्याच्या घावांनी लोळविले. कुलकर्णी बेशुद्ध झाला. परंतु त्याची मिटलेली मिठाची घट्ट मूठ मात्र तशीच कायम होती.

'प्राण गेला तरी मिठाची मूठ उघडू नका' ––– मीठ सत्याग्रहींना महात्मा गांधींचा संदेश होता.

कुलकर्णी आपल्या नेत्याच्या संदेशाला जागला होता.

□ □

म. ग्रं. सं.
क्र. २०७८ ... १०/९/८
विषय बा-वा.

# जंगले पेटली !

जुलै–ऑगस्ट, पाऊस सुरू झाला आणि काय आश्चर्य ? गांधीजींच्या आगीने त्या भर पावसाळ्यात जंगलेही पेटली. संपूर्ण देशांतली. जेथे जंगले तेथे जंगल सत्याग्रह. इंग्रज सरकारचे जुलमी जंगल कायदे मोडण्याचा सत्याग्रह.

डोंगर कपारीतला आदिवासी आणि खेड्यांतला शेतकरी सरकारच्या अन्याय्य जंगल कायद्यांनी अतिशय त्रस्त झाला होता. प्रान्ताप्रान्तातील आन्दोलन नेत्यांनी त्यांना हाक दिली–' ते कायदे मानू नका.' हवा, पाण्यावर जसा माणसाचा हक्क आहे तसा निसर्गाने दिलेल्या जंगलावरही आहे. आदिवासीला व शेतकऱ्याला ती मोफत वापरता आली पाहिजेत. जंगलात गुरे चारता आली पाहिजेत. जंगलातील फालतू लाकूड फाटा मिळाला पाहिजे. त्याचा एक पैसाही सरकारला देऊ नका. गुरचराईची फी देऊ नका.

नेत्यांच्या या हाकेने आदिवासींच्या व शेतकऱ्यांच्या काळजाला हात घातला. कारण गुरे–ढोरे ही त्यांची धनदौलत. झोपडी आणि खोपटं हा त्यांचा निवारा. त्यासाठी लागणारा गवत चारा आणि लाकूड फाटा इंग्रज सरकारच्या जुलमी जंगल कायद्यांनी त्यांच्यापासून हिरावून घेतला होता. त्यामुळे 'जंगल कायदे तोडा' या नेत्यांच्या हाकेला देशातील लाखो आदिवासींनी आणि शेतकऱ्यांनी तत्काळ साद दिली आणि भर पावसात जंगले धगधगू लागली.

महाराष्ट्रातील जंगलेही पेटली. पहिली आग लागली नगर जिल्ह्यातल्या संगमनेर व अकोला तालुक्यातल्या जंगलांना.

**अकोला–संगमनेर**

अकोला तालुक्यातील डांगण भागामधील चाळीस गावांतील शेतकरी लढ्यासाठी सिद्ध झाला. पण त्यांच्या मनात एक शंका होती. हातात विळा कोयता आणि कुऱ्हाड सदैव बाळगणारा तो शेतकरी. गांधीजींची लढाई अहिंसक. शेतकरी म्हणू लागला, 'गांधीचं समदं पटतंय पण दुसऱ्यानं मारलं तरी आपुन गप राहृयचं हे मातर पटत नाय.' हातातली कुऱ्हाड वापरायची नाही हे कसं काय ?

शेवटी गावोगांव विचार होऊन शेतकऱ्यांनी हा पेच सोडविला. भाविक व अंधश्रद्ध शेतकरी. अशी आख्यायिका आहे की, गावोगाव त्यांनी देवाला कौल लावला आणि आश्चर्य असे की, देवाने कौल दिला 'सत्याग्रह करा, कोणाला मारूं नका'. डांगण भागातील शेतकऱ्यांना देवाने असा कौल दिल्याची वातमी तमाम अकोला आणि संगमनेर तालुक्यातील खेड्याखेड्यात वाऱ्यासारखी पसरली.

रामकृष्णदास महाराज नांवाचे कॉंग्रेसचे तालुक्यांतले एक मोठे लोकप्रिय शेतकरी नेते होते. त्यांनी आणि अच्युतराव पटवर्धन, केशवराव गरुड, सठ्ठा, सरदेसाई, श्री. रा. टिकेकर वगैरे कार्यकर्त्यांनी तीन महिने तालुक्यांत, गावागावांत फिरून जंगल सत्याग्रहासाठी शेतकऱ्यांच्या मनाची मशागत अगोदरच करून ठेवली होती. आता तर देवाने कौल दिला. सत्याग्रहाचा शेतकऱ्यांचा निर्णय पक्का झाला.

ठिकठिकाणी दहा दहा–पंधरा पंधरा गावांच्या सभा मध्यवर्ती गावात सुरू झाल्या. हजारो शेतकरी जमत. दिवस पावसाळ्याचे. सर्वत्र नदी नाले भरभरून वाहात होते. तरी हजारो शेतकरी जमत. त्यांच्या बरोबर तालुक्यातले आणि बाहेरचे त्यांचे पांढरपेशे नेतेही चिखल तुडवीत येत.

अकोला व संगमनेर, दोन्ही तालुके सत्याग्रहाच्या वातावरणाने लवकरच दुमदुमू लागले.

तालुक्यातील सरकारी अधिकारी जागे झाले. ही जंगलच्या सत्याग्रहाची आग आपल्या तालुक्यांत नको. पोलिसांनी पहिला प्रहार सत्याग्रहाच्या मुख्य पुढाऱ्यावर– रामकृष्णदास महाराजांवर केला. मग दुसरा घाव घालायला पोलिस पोचले अकोल्याच्या जाहीर सभेत. कोतूळ, समशेरपूर वगैरे दहा गावातील सुमारे पाच हजार शेतकरी सभेला आले होते. सरदेसाई व सठ्ठा भाषण करीत होते. सभा चालू असतानाच त्यांना पकडले. आपल्यासाठी कष्ट सोशीत रानोमाळ हिंडणाऱ्या आपल्या पुढाऱ्यांवर हात टाकल्याचे पाहून सभेसाठी जमलेला शेतकरी संतापला. पण पुढाऱ्यांनी त्यांना आवरले. नाहीतर त्या दिवशी शेतकऱ्यांनी त्या पोलिसांची हाडेच मोडली असती आणि स्वतःचेही रक्त गमावले

असते. मराठा व कोळी समाजातील कडवा शेतकरी तो. त्यांच्यावर एक घाव घातला, तर शेकडो घाव तो मूठभर पोलिसांवर घालणार आणि मग त्यांच्यावर गोळ्या झाडून त्यांना दहशत वसविण्याची संधी आयतीच मिळणार या भ्रमात पोलिस होते; पण तो खोटा ठरला.

पोलिसखाते त्यामुळे चिडले. त्यांनी सापडतील ते स्वयंसेवक व छोटेछोटे खेडूत कार्यकर्ते पकडायचा सपाटा सुरू केला.

या बेफाम धरपकडीमुळे आगीत तेल पडले. शेतकऱ्यांचा सत्याग्रहाचा निर्धार अधिकच ठाम झाला. एकाच दिवशी दोन्ही तालुक्यात ठिकठिकाणी मध्यवर्ती गावी अनेक सभा सुरू झाल्या. हजारो शेतकरी जमत. सत्याग्रहाची शपथ घेत.

आता शेतकरी सामुदायिक कायदेभंगाच्या आदेशाची आतुरतेने वाट पाहात होते.

अखेर पुढाऱ्यांचा आदेश सुटला. २२ जुलै, १९३० या एकाच दिवशी संगमनेर–अकोला तालुक्यांत एकदम २०–२२ ठिकाणी सत्याग्रह करा, अशी आज्ञा झाली.

आणि आश्चर्य असे की, शेतकरी तयार झाले. गाव गावपुढाऱ्यांनी आणि वरच्या नेत्यांनी अशी काही संघटना बांधली होती, लोकांत जागृती केली होती की, एकाच वेळी एकाच दिवशी २०–२२ ठिकाणी आपण सत्याग्रह करू शकू, असा शेतकऱ्यांत आत्मविश्वास आला होता

आणि ता. २२ जुलैचा तो दिवस आला. सकाळी गांवागांवातून भजने गात, ढोल–ताशे वाजवीत, वंदेमातरम् व म. गांधी की जय या घोषणा देत संकल्पित २०–२२ जंगलांकडे

सत्याग्रहासाठी शेतकऱ्यांच्या शकडो दिंड्या निघाल्या. बरोबर शृंगारलेल्या गाई होत्या.

बरोबर दुपारी बारा वाजता सर्वत्र सत्याग्रह व्हावयाचा होता.

त्या अगोदर सर्व सत्याग्रही दिंड्या आपापल्या नियोजित ठिकाणी पोचल्या. प्रत्येक दिंडीत कुठे हजार, दोन हजार, तर पाच–दहा हजार. सर्व मिळून अक्षरशः एक लाख सत्याग्रही शेतकरी २०–२२ ठिकाणी जमले.

सत्याग्रहा अगोदर गोमातेची पूजा केली. कारण तिच्या लेकरांसाठीच तर सत्याग्रह होता. बरोबर १२ वाजता 'हां, चला घुसा जंगलांत', असा पुढाऱ्यांनी आदेश दिला. त्यासरशी सर्व २०–२२ ठिकाणचे सत्याग्रह नेते आणि लाखभर शेतकरी सरकारने बंदी घातलेल्या जंगल भागांत घुसले आणि कोयत्यांनी भराभर गवत कापावयास सुरूवात केली. कोणी फालतु वाढलेली झाडे पाडली तर कोणी जमिनीवर पडलेला लाकूडफाटा गोळा करून त्याच्या मोळ्या बांधल्या.

शेतकऱ्यांना आश्चर्य वाटले, पोलिस कुठेच कसे नाहीत ? आणि खरोखरच क्वचित एखाद दुसऱ्या ठिकाणी पोलिस बंदो-बस्त होता. इतक्या २०–२२ ठिकाणी सहस्रावधि लोकांना आवरायला सरकारजवळ इतके पोलिस होतेच कुठे ? त्यामुळे नाही लाठीमार की नाही गोळीबार.

गांधीजींच्या सत्याग्रह तंत्राचा हा अभूतपूर्व विजय होता. निःशस्त्रांची प्रचंड संख्या सशस्त्र सत्तेवरही मात करू शकते !

विजयाच्या घोषणा देत 'जंगलका कायदा तोड दिया,' असा घोष करीत तो प्रचंड शेतकरी समुदाय आपापल्या गावी

परतला.

परंतु सरकार स्वस्थ नव्हते. सत्याग्रहाचे नेते नवरे व जोशी कार्यक्रम संपल्यावर दुसऱ्या दिवशी अकोल्याहून संगमनेरकडे जात असताना पोलिसांनी त्यांना अटक केली. जेलकडे रवाना होण्यापूर्वी नवरेंनी निरोप पाठविला—

'सरकारी अधिकाऱ्यांचा हुकूम न मानता आम्ही आमच्याच पुढाऱ्यांचा हुकूम मानतो, असे तुम्ही दाखवून द्या. लढा शेवट-पर्यंत चालवा.'

आणि खरोखरच संगमनेर अकोला तालुक्यातील शेत-कऱ्यांनी आपल्या नेत्यांचा हुकूम मानला आणि सतरा ऑगस्टला पुन्हा प्रचंड सत्याग्रह केला. चन्नापुरी हे या सत्याग्रहाचे मुख्य केंद्र होते. मागच्याप्रमाणे याहीवेळी सत्याग्रहाच्या जागी पोलिस नव्हते. नंतर चार-पांच दिवसांनी चन्नापुरीला एक फौजदार पंचवीस पोलिसांची पार्टी घेऊन आला. चार-पांच पुढाऱ्यांना पकडले. त्याबरोबर शेकडो गावकरी पुढे आले आणि म्हणाले, 'आम्हालाही पकडा.' त्यांनी हट्टच धरला. फौजदार इतक्या लोकांना काय पकडतो ? त्याने पकडलेल्या चार-पांच लोकांनाच सोडून दिले.

झाल्या प्रकाराचे उट्टे काढण्यासाठी दोन-तीन दिवसांनी दोन पोलिस फौजदार शंभर पोलिसांची पार्टी घेऊन परत चन्नापुरीस आले. पहाटे चार वाजता गांवाला वेढा घातला आणि बत्तीस शेतकरी पुढाऱ्यांना गुपचुप पकडून संगमनेरला नेले.

लोक संतापले. चन्नापुरी व आसपासच्या गावातील शेतकरी स्त्री-पुरुषांच्या झुंडी आपल्या गिरफ्दार नेत्यांना सोड-

विण्यासाठी संगमनेरकडे निघाल्या.

अशी ही अकोला–संगमनेर जंगल सत्याग्रहाची अविस्मरणीय कथा.

**बागलाण**

अकोला–संगमनेर मागोमाग बागलाण. जिल्हा नाशिक.

नामपूर–बागलाण तालुक्यातील एक लहानसे गाव तमाम तालुक्याचे सत्याग्रह केंद्र बनले. २३ जूनला सत्याग्रहाची छावणी नामपूरला स्थापन झाली. तालुक्यातील ६२ गावांच्या १६ केंद्रांची सत्याग्रह सूत्रे छावणीतून हलू लागली. स्वयंसेवक गांवोगांव प्रचार करू लागले. प्रचाराला शेतकरी उत्साहाने साथ देत. कारण बागलाणची भूमि अनुकूल होती. मोठे जंगल. शिवाय दांडी यात्रेपासून प्रभात फेऱ्या, मिरवणुका, सभा, प्रचार, व्याख्याने, झेंडावंदन वगैरेचा कार्यकर्त्यांनी धूमधडाका उडवून दिला होता. खेरीज गांवोगावचे पाटील आंदोलनात सामील. त्यांच्या पुढाकाराने बागलाण तालुक्यात शेतसारा तहकुबीची चळवळ जोरात झाली होती. त्यांत थोडे यशही मिळाले होते. त्यामुळे शेतकरी वर्गांत उत्साह आला होता, धैर्य आले होते.

नामपूरला त्या दिवशी म्हणजे छावणी स्थापन झाल्यावर पाच-सात दिवसांतच संपूर्ण बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांची सभा झाली. ही पहिलीच सभा. सभेला १० हजार शेतकरी जमला होता. विशेष म्हणजे तालुक्यातील शेकडो गावपाटील सभेला आले होते.

नाशिकचे कॉंग्रेस पुढारी दादासाहेब गद्रे सभेचे अध्यक्ष होते आणि प्रमुख वक्ते होते महंत सीताराम शास्त्री. शेतकऱ्यांत फार प्रिय.

त्यांनी सभेस जमलेल्या हजारों शेतकऱ्यांना आवाहन केले, 'आपणाला लौकरच सरकारशी मोठी लढाई करायची आहे. तुम्ही शेतसारा बंद करून लढाईत अगोदरच उतरला आहात. आता जंगलात घुसून सरकारचे जुलमी जंगल कायदे कापून काढायचे आहेत पण त्याआधी सलामीची लढाई करायची आहे. वनचराई फी आजपासून बंद. काय कबूल आहे?'

'कबूल कबूल' हजारों शेतकऱ्यांनी दोन्ही हात वर करून होकार भरला. म. गांधी की जय घोषणा निनादू लागल्या.

नेत्यांनी पुन्हा पुन्हा 'कबूल ? कबूल ?' विचारले. 'एकदम कबूल, एकदम कबूल' आरोळ्या ठोकून पुन्हा शेतकऱ्यांनी निर्धार जाहीर केला.

सभेच्या पुढाऱ्यांनी मग गावपुढाऱ्यांना-गावपाटलांना सवाल केला,

'गांवोगांवचे शेकडो पाटील येथे आले आहेत. त्यांना आम्ही विचारतो, तुम्ही काय करणार ? शेतकरी तर सरकारशी लढायला निघाला आहे. तुम्ही काय करणार ? तुम्ही त्यांच्या-बरोबर लढणार की सरकारची नोकरी करणार ?'

बराच वेळ काही आवाज येईना. कुजबूज सुरू होती. पुढाऱ्यांनी परत विचारले, 'सरकारची सेवा करणार की तुमच्या लोकांची सेवा करणार ?'

सभेतील शेतकरीच आता पाटील मंडळींना स्वस्थ बसू देईनात. त्यांना कोपराने ढुश्या देत म्हणू लागला, 'बोला की राव आता. तुमी आमच्यावरूबर ऱ्हानार की सरकारचे बूट चाटत बसणार ?' 'सरकारबरूबर कसं ऱ्हातील ? आमी त्येंना

तसं ऱ्हावू देनार नाही ' वगैरे वगैरे.

आणि मग एकदम दहा-वीस हात वर झाले, 'आमी लोकांसंगं जानार. राजीनामा द्येयाला तयार आहोत' 'कबूल कबूल, आमी दिला राजीनामा.' इतर पाटलांना धीर आला. आणि शेकडो पाटलांचे संमतीचे हात वर झाले.

पाटील मंडळींनी आपला शब्द खरा केला. तालुका मामलेदार कचेरीत पाटलांचे राजिनामे धडकू लागले. दोनशे राजीनामे धडकले. मामलेदार थक्क झाले. अस्वस्थ झाले. कारण तो त्यांच्या इभ्रतीचा प्रश्न होता. इभ्रतीचा डोलारा ढासळून पडत होता. मामलेदार राजीनामा घेऊन येणाऱ्या पाटलाला समजुतीने विचारीत, 'नीट विचार केला आहात ना ?' उत्तर मिळे, 'इचाराशिवाय कसं काय करूं, साहेब ? सगळाच शेतकरी फिरला. आमी तरी स्वस्थ कसे बसणार ?'

नामपूरच्या सभेमागोमाग तालुक्यात जागोजाग छावण्या स्थापन झाल्या. शेकडो खेडूत स्वयंसेवक छावण्यात भरती होऊ लागले. स्वयंसेवक व राजीनामा दिलेले पाटील गावोगांव प्रचार करीत फिरू लागले. जून अखेर वनचराई भरण्याची शेवटची तारीख होती. हजारोहजार शेतकऱ्यांनी आपला निर्धार पुरा केला. वनचराई फीचा भरणा भयंकर रोडावला.

तालुका अधिकारी बेचैन झाले. आताच शेतकऱ्यांची ही चळवळ चेपली पाहिजे, नाहीतर वणवा पेटेल. हुकुम सुटले. वनचराई न देणाऱ्यांची गुरेढोरे, शेळ्या-बकऱ्या कोंडवाड्यात घालण्याचा पोलिसांनी सपाटा सुरू केला. हजारों जनावरे कोंडण्यात आली. सरकारजवळ त्यांना खायला घालायला

चारा नव्हता. पोटच्या लेकरांप्रमाणे वाढविलेली ती मुकी लेकरे उपाशी मरण्याची भीति शेतकऱ्याला वाटू लागली. कोंडवाड्यातून गुरे सोडवून आणावी म्हटले तर प्रत्येक गुरामागे एक रुपया दंड द्यावा लागणार. शिवाय पोलिसांच्या हातावर चिरिमिरी. शेतकरी कमालीचा हवालदिल झाला. गुरचराई न देण्याचा त्याचा निश्चय ढासळणार अशी भीती निर्माण झाली. पुढाऱ्यांना चिंता वाटू लागली.

तव्हा पुढाऱ्यांनी एक नामी युक्ती काढली. ' गांवोगावचे कोंडवाडे पाडून जमीनदोस्त करा ' असे फर्मान काढले. त्याबरोबर गांवोगावचे कोंडवाडे पाडण्यात आले आणि जनावरे मुक्त झाली.

शेतकरी त्याही पुढे गेला. आता तो सर्रास आपली गुरे जंगलात चरावयास सोडू लागला. आऊतांसाठी व घराकरिता जंगलातला फालतु लाकूडफाटा बिनधास्त आणू लागला.

सरकारचे मूठभर पोलीस काय करणार ? ते असहाय्य झाले.

शेतकरी आता सामुदायिक जंगल सत्याग्रहाच्या दिशेने झपाट्याने चालला होता.

सरकार स्वस्थ कसे बसेल ? महंत सीतारामशास्त्री या शेतकऱ्यांच्या सर्वांत प्रिय पुढाऱ्याला नामपूरच्या सभेनंतर सरकारने पकडलेच होते. तरीही शेतकऱ्यांचे इतर नेते, स्वयंसेवक आणि शेतकरी दबत नव्हते. उलट पाटलांचे राजीनामे धडाधड मामलेदार कचेरीत येत होते. शेतकऱ्यांनी गुरचराई देणे बंद केले होते. सभा-मिरवणुका होत होत्या. स्वयंसेवक शेकडोच्या संख्येने भरती होत होते.

तेव्हा सरकारने स्वयंसेवकांना गिरफ्तार करून तुरुंगात कोंडण्याची मोहीम सुरू केली. त्याचाही काही उपयोग होईना. एक स्वयंसेवक तुरुंगात गेला की त्याच्या जागी दहा नवे उभे राहात. पकडायला येणाऱ्या पोलिसांवर गावकऱ्यांचा बहिष्कार एवढा तीव्र की त्यांना गावात प्यायला पाणी की विडी मिळा-यची मुश्किल.

सामुदायिक सत्याग्रहासाठी शेतकरी आता पूर्णपणे सिद्ध झाला आहे अशी वरिष्ठ काँग्रेस नेत्यांची खात्री पटली. महाराष्ट्र काँग्रेस कायदेभंग मंडळाने लक्ष्मणशास्त्री जोशी यांना बागला-णच्या आंदोलनाचे मुख्याधिकारी नेमले होते. नरहर गोपाळ शेट नामपूरकर, नारायण नथू पाटील, सजन पाटील, देवचंद पाटील, गोपाळ पाटील, आत्माराम शेट वगैरे अनेक मातब्बर स्थानिक नेते लक्ष्मणशास्त्रींबरोबर उत्साहाने काम करीत होते.

या नेते मंडळींनी सामुदायिक जंगल सत्याग्रहाचे शेवटचे पाऊल उचलायचे ठरविले. तारीख ठरली–५ ऑगस्ट. जागा ठरली –भीलवाड. भीलवाड या एकाच गावी हजारो शेत-कऱ्यांनी जंगलात घुसून जंगलचा जुलमी कायदा विळ्या–कोयत्याने कापून काढायचा.

भीलवाड जवळील मांगीतुंगी डोंगरातील जंगलात सत्याग्रही जमावाने घुसायचे. मांगीतुंगी हे जैनधर्मियांचे पवित्र क्षेत्र. दरसाल तेथे मोठी जत्रा भरते. दूरदूरचे जैन भिक्षुक जत्रेला येतात. महावीरांच्या सत्य अहिंसेला साजेशा गांधीजींच्या सत्याग्रहाला साजेसे रणक्षेत्र.

सामुदायिक सत्याग्रहाचा दिवस–५ ऑगस्ट उजाडला. मांगीतुंगीच्या दिशेने तालुक्यातील गांवोगांवाचे शेतकरी जत्थ्या-जत्थ्याने घोषणा देत वाजत–गाजत निघाले. ऐन पावसाचे, थंडी-वाऱ्याचे दिवस. नदी–नाले भरून वाहात होते. राने चिखलाने भरलेली. पण त्या निर्धारी सत्याग्रहींना कशाची पर्वा नव्हती.

मांगीतुंगी डोंगराच्या पायथ्याशी सकाळी १०–११ पर्यंत चोहोदिशांनी लाखभराचा बायका–पुरुष मराठमोळा जमला. डोक्यावर उपरणे आणि घोंगडी, अंगात खमीस, हातात काठी, कमरेला विळा–कोयता अशा शेतकऱ्यांचा विराट मेळावा जमला. त्यांत दोन हजार तरी स्त्री सत्याग्रही होत्या. धुळे, साक्री, नगर, संगमनेर, अकोला, नाशिक, मालेगाव, दाभाडी अशा लांबलांबच्या गावांहून लोकांच्या झुंडीच्या झुंडी ही लढाई पाहायला आले होते. त्यांत मालेगावचे प्रमुख मुसलमान व्यापारी होते.

बंदोबस्तासाठी बऱ्याच पोलीस पार्टर्या घेऊन खुद्द जिल्ह्याचा डेप्युटी पोलिस सुपरिटेंडेन्ट उभा होता. एवढा पोलिस फाटा असला तरी जमलेल्या शेतकरी सत्याग्रहींना त्यांची भीती वाटत नव्हती. कारण शेतकरी होते एक लाख आणि पोलिस असतील दीड-दोनशे.

लाठीमार झाला, गोळीबार झाला तर जखमींना तावडतोब उपचार व्हावा म्हणून नाशिकचे तीन डॉक्टर्स आपल्या रेडक्रॉस स्वयंसेवकांसह हजर होते.

सत्याग्रहींच्या एक लाखांच्या सेनेचे सेनापती होते नाशिकचे काँग्रेस पुढारी दादासाहेब गद्रे.

कार्यक्रमाला प्रारंभ झाला. प्रथम हजारो कंठातून हरिनामाचा प्रचंड गजर होऊ लागला. नंतर विधिवत् गोपूजन. त्यानंतर सभेला सुरुवात झाली. वंदेमातरम्च्या घोषात पुढारी भाषण करायला उठले. भाषण संपल्यावर मुख्य पुढाऱ्याने प्रतिज्ञा वाचून दाखविली. –

'जंगलचा जुलमी कायदा मानणार नाही.'

'वनचराई देणार नाही.'

'आम्ही न्यायासाठी शेवटपर्यंत लढू.'

'कोणाला मारणार नाही आणि कोणाचे मानणार पण नाही.'

एकेका वाक्याचा पुनरुच्चार करून उपस्थित जमाव साथ देत होता.

आकाश दुमदुमून टाकणाऱ्या घोषणा झाल्या आणि एक लाख स्त्री–पुरुष सत्याग्रहींचा तो विशाल समुदाय जत्थ्या–जथ्थ्याने मांगीतुंगीचा डोंगर चढू लागला. त्यांचा उत्साह व निर्धार पाहून सत्याग्रह पाहायला आलेले मालेगावचे मुसलमान व्यापारीही घोषणा देत त्यांच्यात सामील झाले.

पोलिसच काय कोणतीही शक्ती त्यांना थोपवू शकणार नव्हती. जिल्हा डेप्युटी पोलिस सुपरिंटेंडेंट व त्याच्या पोलीस पार्टी स्वस्थ उभ्या होत्या.

मांगीतुंगी चढून वर पोचताच सत्याग्रह युद्धाचे सेनानी दादासाहेब गद्रे गवताच्या उंच रानात विळा घेऊन घुसले आणि गवत कापून कायदेभंगाला सुरुवात केली. त्यांच्या मागोमाग मग शेतकरी सत्याग्रहींचे शेकडो जत्थे रानात घुसले आणि

सपासप गवत कापू लागले.

'जंगल का कायदा तोड दिया 'ची गर्जना लाख मुखांतून निघाली आणि आकाश भेदून गेली.



तिकडे मांगीतुंगी डोंगराजवळच्या पठाराच्या डोंगरावर त्याचवेळी नाशिकच्या डॉ. खाडिलकरांनी तिरंगा फडकावला आणि त्याच्या साक्षीने शेकडो सत्याग्रहींसह 'जंगल का कानून तोड दिया.'

तास–दोन तास असा कार्यक्रम झाला. तो संपताच डोंगराएवढा सत्याग्रहींचा तो जमाव मांगीतुंगी उतरून खाली येत होता तेव्हा त्याच्या मुद्रेवर अभिमान व विजय दिसत

होता. आण हातात किंवा डोक्यावर दिसत होत्या सत्याग्रह करून आणलेल्या गवताच्या पेंड्या नाहीतर लाकूड फाट्याच्या मोळ्या.

पोलीस पसार झाले. त्यांनी कोणालाच पकडले नाही. काही दिवसांनी सत्याग्रहाचे सेनानी दादासाहेब गद्रे व इतर निवडक पुढाऱ्यांना अटक झाली.

मांगीतुगी जंगलाची आग तालुक्यातील दुसऱ्या जंगलात पसरली तर तालुक्यातील सरकारी अब्रू त्यात जळून खाक होईल हे पोलीस खाते चांगले जाणून होते.

फक्त वरच्या पुढाऱ्यांना पकडून भागणार नाही, मूळावर घाव घातला पाहिजे. जोपर्यंत तालुक्यात पसरलेल्या सत्याग्रह छावण्या कायम आहेत आणि स्वयंसेवकांचे जत्थेच्या जत्थे गावोगाव शेतकऱ्यांना 'चिथावणी' देत फिरत आहेत तो पर्यंत सत्याग्रह थांबणार नाही, हे सरकारने ताडले. पोलिसांनी एकाच दिवशी २५ ऑगस्टला तालुक्यातील सर्व सत्याग्रही छावण्यांवर धाड घातली आणि त्या जप्त केल्या. तालुक्याचा काना-कोपरा पिंजून स्वयंसेवक पकडले. तालुक्याच्या सभोवती पोलिस चौक्या बसविल्या आणि तालुक्यात एकही स्वयंसेवक बाहेरून येणार नाही असा बंदोबस्त केला. खेडूत सत्याग्रही पुढाऱ्यांनी सरकारवर मात केली. त्यांनी फिरत्या सत्याग्रही छावण्या सुरू केल्या. त्या काही दिवस चालल्या.

अशी गनिमी काव्याची लढाई थोडे दिवस चालली आणि तीही काही दिवसांनी संपली.

## चिरनेर

अकोला, संगमनेर आणि वागलाण मधील जंगलातील आग पनवेल तालुक्यातही पोचली.

भर पावसाळ्यात ८ ऑगस्टला पनवेल तालुक्यातील कल्हे, चिरनेर आणि चावणे या तीन ठिकाणी एकदम जंगले पेटली. तारे, वांधणवाडी, साई, केळवणे, दिघाठी, कासारभाट, टावे, शिरढोण, पळसे वगैरे अनेक गावांतून आलेला अडीच हजारांचा शेतकरी सत्याग्रहचांचा जमाव कल्हे गावाजवळच्या जंगलात घुसला आणि जळाऊ लाकडांच्या फांद्या कुऱ्हाडी-कोयत्याचे घाव घालून सपासप तोडू लागला. एवढ्या प्रचंड जमावापुढे पोलीस काय करणार ? त्यांनी फक्त सहा आग्री शेतकरी पुढाऱ्यांना पकडले. चिरनेर व चावणे गांवी अगदी असाच प्रकार घडला. या यशस्वी जंगल सत्याग्रहाने शेतकरी कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला आणि पुन्हा ११ ऑगस्टला व १८ ऑगस्टला चिरनेर, चावणे, वाजे, पोयंजे वगैरे सहा गावी एकाच दिवशी शेतकऱ्यांनी सामुदायिक जंगल सत्याग्रहाची धमाल उडवून दिली. लाठ्या चालविण्याच्या व गोळ्या घालण्याच्या पोलिसांच्या धमक्यांना त्यांनी भीक घातली नाही.

या सर्व सत्याग्रहांत काही नेत्यांना अटक झाली आणि एकेक वर्षाच्या सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या.

पण या कशाचीही पर्वा न करता २५ ऑगस्ट पासून सतत एक आठवडाभर निरनिराळ्या गांवी एका मागून एक सामुदायिक जंगल सत्याग्रह करण्याची घोषणा कॉंग्रेस नेत्यांनी केली.

सत्याग्रह सप्ताहातील पहिला सत्याग्रह चिरनेर येथे २५ ऑगस्टला होणार होता. चिरनेरला होणारा हा तिसरा सत्याग्रह.

पोलीस आणि सत्याग्रही नेते जय्यत तयारी करून राहिले होते. आज काही तरी भयंकर होणार अशी शंका अनेकांच्या मनात डोकावून गेली.

२५ ऑगस्टला सकाळी १० वाजता कांग्रेसची देशसेविका पथक, स्वयंसेवक पथक व शुश्रुषा पथक अशी तीन पथके चिरनेर गावी दाखल झाली.

त्या मागोमाग चिरनेर, कोपोली, पाणदिवे, मोठी व धाकटी जुई, टाकी, भोम, खोपटे, आवरे, पिरकोने, सार्डे, शेगी वगैरे दहा पंधरा गांवचे शेकडो शेतकरी प्रभात फेऱ्या, भजनी मेळे घेऊन रामाच्या देवळापाशी जमू लागले. याशिवाय आणखी शेकडो लोक अक्कादेवीच्या माळावर जमले होते.

एकूण ५ हजार शेतकरी स्त्री-पुरुष व मुलांचा निशःस्त्र समुदाय लढण्यासाठी सिद्ध झाला.

आणि त्यांच्या समोरच बंदुकधारी व लाठीधारी पोलीस व मामलेदार, पोलीस इन्स्पेक्टर, फॉरेस्ट रेंजर, गार्ड, बीटगार्ड्स्, चार-पाच गांवचे तलाठी, पोलीस पाटील यांचा ताफा जय्यत तयारीने अक्कादेवी माळावर उभा होता.

दुपारचे १२ वाजले. रामाच्या देवळासमोर गोमातेचे पूजन झाले आणि भजनी दिड्यांसह झांजांच्या घोषात आणि घोषणांच्या निनादांत त्या ५ हजारांच्या लोक सेनेने अक्कादेवी माळावरील वडाच्या विशाल वृक्षाकडे कूच केली.

५ हजारांपैकी २ हजार लोकांची सत्याग्रही तुकडी तयार करण्यात आली.

समोर टेकडीवर जंगल पसरले होते. २ हजारांचा सत्याग्रही समुदाय हातात विळे, कोयते, काठ्या घेऊन आपल्या कामगिरी-

साठी टेकडी चढून जाऊ लागला. त्यांच्या मागोमाग पोलीस इन्स्पेक्टर, पोलीस शिपाई, रेंजर गार्ड, तलाठी वगैरे मंडळीही चालू लागली. मामलेदार व त्यांच्या बरोबर एकदोन शिपाई मात्र खाली माळावर एका झाडाखाली बसून राहिले.

पोलीस इन्स्पेक्टर पाटील चळेल व मग्रूर होता. आजवरच्या सत्याग्रहांच्या यशाने त्याच्या नाकाला मिरच्या झोंबल्या होत्या. सत्याग्रहींना धडा शिकविण्याच्या संधीची तो वाट पाहात होता. सत्याग्रही शांतपणे टेकडी चढत होते, पण या पाटलाला ती शांतता सहन होत नव्हती. सत्याग्रहींना चिडवून, प्रक्षुब्ध करून त्यांच्या कडून हिंसा घडवावी आणि मग त्यांना चेचून काढावे असा पाटलाचा डाव होता. कोणा सत्याग्रहीला धक्का मार, कोणाला छडी मार, कोणाच्या मुस्कटात दे असा प्रकार इन्स्पेक्टर पाटलाचा चालू होता. त्याने कांही लोकांना पकडले आणि टेकडी खाली पाठवून दिले. कांहीच्या हातांत बेड्या घालून कैद केले. तरीही सत्याग्रही शांत होते.

त्यांच्यातील काही प्रतिष्ठित मंडळी टेकडी उतरून खाली माळावर झाडाखाली बसलेल्या मामलेदाराकडे गेली आणि तक्रार करू लागली.

'तुमच्या पोलीस इन्स्पेक्टरला आवरा. उगीच आगीत तेल ओतू नका.'

मामलेदार जबाबदार अधिकारी होता. आपल्या पोलीस इन्स्पेक्टरच्या उन्मतपणाने लोक खवळले आणि भलतेच काही घडले तर ? त्याला भय वाटले.

तो तावडतोब उठला आणि टेकडीवर गेला.

सत्याग्रही काय चोर, लुटारू, खुनी होते ? त्यांच्या पायात

बड्या ठोकलेल्या पाहून मामलेदाराने पोलीस इन्स्पेक्टरला सांगितले, ' पाटील, या लोकांच्या बेड्या काढा पाहूं आधी.'

परंतु पाटील तयार होईना.

तेव्हां मामलेदारने पाटलाला दरडावले, 'मी मॅजिस्ट्रेट तुम्हाला हुकुम करतो आहे, पाटील बेड्या काढा.'

पाटलाने मामलेदारावर जळफळत सर्व लोकांच्या बेड्या काढल्या.

पकडलेल्या लोकांना घेऊन पाटील, त्यांचे पोलीस, मामलेदार व इतर अधिकारी टेकडी उतरून पायथ्यापासच्या नाल्यापाशी आले. तेथे वाट अरुंद व अडचणीची होती. गर्दी खूप होती. सौजन्य म्हणून त्या गर्दीतून पोलीसांना व अधिकाऱ्यांना देश-सेविकांनी साखळी करून वाट काढून दिली.

तेथून पुढे रस्ता रुंद आणि मैदान मोकळे होते. साखळीची आता गरज नाही म्हणून देशसेविकांनी साखळी मोडली. त्या सरशी लोकांची गर्दी पोलीस इन्स्पेक्टर व पोलीस यांच्या जवळ आली. पोलीस इन्स्पेक्टर बरोबर गावचा सरकारधार्जिण पोलीस पाटील चालत होता. त्याच्याशी कांही लोकांची बोलाचाली झाली. आता गावकरी आपणाला धरून चोपणार या भीतीने पोलीस पाटील पोलिसांच्या घोळक्यात घुसला. तशी लोकांच्यांत व पोलिसांत बाचाबाची सुरू झाली. पोलीस जवळच्या एका जाळी-मागे गेले.

मामलेदार दमून गेला होता. तहान लागली म्हणून जवळच्या ओहोळाकाठच्या विहिरीवर पाणी प्यायला गेला होता.

त्याची पाठ फिरताच इकडे जाळीमागून पोलीसांनी जमावावर गोळीबार सुरू केला.

बंदुकीचा आवाज ऐकूण मामलेदार धांवत वडाच्या झाडापाशी हात वर करीत ओरडत आला, 'अरे गोळीवाराचा हुकुम कोणी दिला ? अगोदर गोळीबार थांववा.'

मामलेदाराचे हे शब्द हवेत विरतात न विरतात तोच एक गोळी सूं ऽऽऽ सूं ऽऽ करीत येऊन त्याच्या छातीत घुसली आणि तो धाडकन् खाली कोसळला. मामलेदार जवळ उभा असलेला एक जंगल अधिकारीही गोळी लागून खाली पडला.

सट् सट् सट् गोळ्या सुटल्या आणि लोक भराभर खाली कोसळू लागले.

हाहा:कार उडाला. धावाधाव सुरू झाली. पाचसात मिनिटे बंदुकीतून गोळ्या सुटत होत्या. पोलीस घावरून गांवाकडे पळत सुटले. लोक त्यांचा पाठलाग करू लागले. पळतानाही मागे वळून पाठलाग करणाऱ्या जमावावर पोलीस गोळ्या झाडीत होते. देशसेविका पथकाच्या नायक विमला गुप्ते या गोळीवारातही निर्भयपणे उभ्या होत्या.

पोलीस चावडीत जाऊन पोचले, तरी त्यांचा गोळीवार चालू होता.

जागच्या जागी गोळीवारात पोलिसांनी पांच लोकांचा बळी घेतला. दोन जखमी मागाहून इस्पितळात मृत पावले. आनंदा पाटील, रघुनाथ न्हावी, धाकु फोकेकर, आल्या पाटील, परशराम पाटील, रामा कोळी, हाशीराम पाटील, या सात हुतात्म्यांच्या रक्ताने चिरनेरची भूमी पवित्र झाली.

गोळ्या सुटत होत्या तरी गोळीवारात कोसळलेल्या मामलेदाराचे डोके आपल्या मांडीवर घेऊन देशसेविका विमला गुप्ते त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत होत्या. त्यांनी मामलेदारांच्या

तोंडात घोटभर पाणी घातले न घातले तोच मामलेदाराचे प्राण निघून गेले.

**बिळाशी**

बिळाशी, सातारा जिल्हाच्या डोंगराळ भागातील एक मध्यम गांव.

तारीख १८ जुलै, १९३० चा दिवस. पावसाची झिमझिम चालू होती, तरी गावांतील रामेश्वर महादेवाच्या आवारात शेकडो खेडूत जमले होते. आज एक अभिनव कार्यक्रम होता. लोक उत्सुकतेने तो पाहाण्यासाठी जमले होते.

देवळाजवळ तब्बल ३४ फूट लांबीचा एक सागवानी सोट पडलेला होता. तो आज समारंभाने देवळाच्या आवारात रोवायचा होता आणि त्यावर सूर्यनारायणाच्या साक्षीने स्वातंत्र्याचे तिरंगी निशाण फडकवायचे होते.

या कार्यक्रमात अभिनव ते काय होते? अभिनव असे निश्चितच होते. तो ३४ फूट उंचीचा किमती सागवानी सोट साधासुधा लाकूड बाजारांत दहा-वीस रुपये फेकून घेतलेला सोट नव्हता. तो स्वातंत्र्याचा स्तंभ होता, जंगल कायदा मोडून जंगलांतून लोकांनी आणलेला सोट ! त्यावर स्वातंत्र्याची पताका मिरविणार होती. आणि तिच्या साक्षीने सत्याग्रहाचे, आंदोलनाचे सर्व सामुदायिक कार्यक्रम यापुढे करायचे ठरले होते. या स्वातंत्र्य स्तंभावरील चैतन्यशील स्वातंत्र्य ध्वजाचे प्रथम दर्शन घ्यायचे आणि मग सत्याग्रहासाठी कूच करायची असा गांवकरी सत्याग्रह नेत्यांनी निर्णय जाहीर केला होता.

लोक जमले. कांही तरुण मंडळी पुढे झाली. त्यांनी उंचच उंच सोट उचलला, खांद्यांवर घेतला आणि आवाराच्या मध्यभागी

आणला. तरुणांचा दुसरा गट सोट रोवण्यासाठी खोल खड्डा खणीत होता. खड्डा खणून झाला.

शंभू महादेवाच्या व गांधीजींच्या जयघोषात त्या तरुणांनी सोट उभा केला आणि एका वृद्ध सत्याग्रही नेत्याच्या हस्ते तो रोवला. एक चपळ तरुण झरझर सोट चढून गेला आणि सोटाच्या टोकावर तिरंगा फडकावला.

'वंदे मातरम', 'भारत माता की जय', 'म. गांधी की जय' घोषणा शेकडो कंठातून निनादल्या. 'विजयी विश्व तिरंगा प्यारा' गीत झाले.

स्वातंत्र्याचे निशाण गावावर उंच उंच फडकू लागले. जमलेले खेडूत आनंदाने आणि अभिमानाची भावना घेऊन निघून गेले.

गांवकरी आनंदले तर गांव पोलीस पाटील लक्ष्मण पाटील घावरला. त्याच्या भाषेत तो सोट चोरीचा होता. जंगल कायदा मोडून आणलेला. तो गावच्या सरकारी जागेत रोवला आहे आणि त्यावर पुन्हां बंडखोर कांग्रेसचे निशाण फडकतेय. हे उघड बंडच आहे. आपल्या समक्ष हे सर्व झाले. आता आपली धडगत नाही. आपली पोलीस पाटीलकी जाणार. लक्ष्मण पाटील भयंकर घावरला.

दुसऱ्या दिवशी पोलीस पाटील तालुक्याला पळाला आणि त्याने आपल्या गावच्या त्या गुन्ह्याची मामलेदाराला वर्दी दिली. मामलेदारही घावरला. आपल्या तालुक्यात हा गुन्हा ? गोरा कलेक्टर आपली खैर ठेवणार नाही.

मामलेदाराने पोलीस फौजदार बंकटसिंगला हुकुम दिला, 'विळाशीला तावडतोव पोलीस पार्टी घेऊन जा आणि तो सोट व झेंडा जप्त करून आणा.'

फौजदार बंकटसिंग २१ जुलैला विळाशीला आला. फक्त ५।६ विन हत्यारी पोलीस त्याच्या बरोबर होते. त्याला वाटले काम सोपे आहे. एवढ्या पोलिसांवर भागेल.

स्वातंत्र्याचे निशाण आणि सोट जप्त करायला फौजदार व पोलीस आल्याची बातमी गावांत पोचताच कांही गांवकरी रामेश्वर महादेवांच्या देवळापाशी आले. फौजदाराने आणि पोलिसांनी सोटाला हात घालताच जमलेले लोक पुढे सरसावले आणि त्यांना बाजूला सारून घेराव घातला. थोडी बोलाचाली झाली. एकटा फौजदार व ५।६ निशःस्त्र पोलीस एवढ्या लोकां-पुढे काय करणार ? हळु हळू जास्त जास्त लोक झेंड्यांच्या रक्षणासाठी जमू लागले. ८।१० हजारांचा जमाव जमला. आता तर फौजदार हतबल झाला. एवढा विशाल समुदाय, पण कोणी फौजदाराला किंवा पोलिसांना हात लावला नाही.

फौजदार व पोलीस जायला निघाले. जेवणाची वेळ झाली होती, पण त्यांना कोणी जेवू घातले नाही. बाजारात गेले तर कोणी त्यांना सामान दिले नाही. गांव कामगारांना पिटाळले, पण त्यांनाही कोणी सामान दिले नाही. फौजदाराच्या व पोलिसांच्या घोड्यांनाही उपास पडला.

ता. २४ जुलैला परत जय्यत तयारीने पोलीस आले. एक इन्स्पेक्टर, जिल्हा पोलीस अधिकारी आणि ५४ पोलीस. त्यांपैकी १९ जवळ लाठ्या होत्या आणि ३५ जवळ एकबारी बंदुका. त्या दिवशी झेंडा व सोट जप्त करायला पोलीस येणार याची बातमी अगोदरच आसपासच्या खेड्यांत पोचली होती. त्यामुळे सायंकाळी पोलीस पार्टी पोचण्यापूर्वीच हजारो खेडूत झेंड्याच्या रक्षणासाठी विळाशीत जमले होते. त्यांत शेकडो स्त्रियाही

अहमहमिकेने सामिल झाल्या होत्या. एवढा प्रचंड जमाव पाहून पोलीसांना हात हलवित या दुसऱ्या वेळीही परत जावे लागले.

गोऱ्या सरकारच्या नोकरशाहीची इभ्रत विळाशीत पणाला लागली.

असा जवळ जवळ एक महिना गेला. दरम्यान २६ ऑगस्टला भर पावसात रेठरे, चरण, विळाशी इत्यादी इस्लामपूर तालुक्या-तील ५ – २५ खेड्यांतील सुमारे ५० हजार खेडुतांनी जंगलात घुसून जंगल सत्याग्रहाची ज्योत तेवत ठेवलीच होती. लोक दबत नाहीत अशी नोकरशाहीची खात्री होताच तिने जुलुम जबरदस्ती व अत्याचाराला प्रारंभ केला. गांधी टोपी घातलेला कोणी दिसला की त्याला मारहाण सुरू झाली. सत्याग्रहींची शिबिरे उध्वस्त होऊ लागली. इस्लामपुरात पोलिसांनी कहरच केला. जंगलातून कापून आणलेल्या बेकायदा सागवानी सोटावर गावकऱ्यांनी त्या गावीही तिरंगा फडकाविला होता. तो काढून टाकून पोलिसांनी त्याच्यावर गोऱ्या सरकारचे युनियन जॅक निशाण लावले. अष्टयात असाच प्रकार घडला.

आणि आता ५ सप्टेंबरला विळाशीवर पोलीसांची पुन्हां धाड आली. विळाशी त्यांच्या डोळ्यात सलत होती. दीड-दोन महिने गोऱ्या सरकारला आव्हान देऊन विळाशीकरांनी आपल्या गांवच्या सोटाचे व त्यावर डौलाने फडकणाऱ्या स्वातंत्र्य ध्वजाचे रक्षण केले होते.

आता सरकार हे चालू देणार नव्हते. विळाशीचे बंड मोडून काढण्यासाठी सरकार सिद्ध झाले. ५ सप्टेंबरला जिल्हा पोलीस अधिकारी २५० हत्यारी पोलीसांसह विळाशीत दाखल झाले. त्या अगोदर विळाशी आणि मंगरूळ व रेळे या लगतच्या

गावांची १५० पोलीस ठेवून नाकेबंदी करण्यात आली होती. कोणीही 'गांधीचा माणूस' त्या परिसरात येणार नाही किंवा बाहेर जाणार नाही याचा कडक बंदोबस्त करण्यात आला होता.

दिवस उजाडीच सकाळी ७ वाजता जिल्हा पोलीस अधिकारी पोलीस पार्टीसह विळाशी गावांत आले. गाव आता कुठे जागे झाले होते. लोक अद्याप घरातच होते. रामेश्वराच्या देवळात मात्र नामसप्ताह चालू असल्याने गांवचे आणि परगांवचे शेकडो पुरुष, दोनशे वायका व मुले मिळून ७।८ शे लोक जमले होते. काही बाहेर वसले होते.

पोलीस देवळापाशी आले आणि त्यांनी अकस्मात लोकांना झोडपायला सुरुवात केली. ५० पोलिसांची एक टोळी झेंड्याचा सोट उखडू लागली.

त्यासरशी ६० स्वयंसेवक व २० स्त्रिया झेंड्याच्या रक्षणासाठी पुढे सरसावल्या. पोलिसांची फळी फोडून ते झेंड्यापाशी पोचले आणि त्यांनी सोटाला भक्कम विळखा घातला. त्यांत राजू कदम नावाची एक शूर तरुणी होती. तिच्या नाकावर पोलीसांनी लाठीचा जोरदार तडाखा हाणला. राजूचे तोंड रक्तबंबाळ झाले. पण तिचा झेंड्याच्या सोटावरील विळखा मात्र एवढा सुद्धा ढिला पडला नाही. वरून लाठ्या बसत होत्या व राजूचा विळखा अधिकच मजबूत होत होता. अखेर पोलिसांनी हिसका हिसकी करून तिचा विळखा सोडविला व तिला फरफटत सोटापासून ओढत नेले.

पोलिसांना जणु विजयाचा मद चढला. ते देवळात घुसले आणि तेथे सापडेल त्याला धोपटण्यास सुरुवात केली. मृदुंग, तंबोरा व मखर मोडून तोडून टाकले. गुरवालाही बेदम मारले.

अद्यापही पोलिसांची नशा उतरली नव्हती. दोन तासांत हे पाशवी अत्याचार आटोपून पोलीस परत जायला निघाले आणि जाता जाता दहशत वसविण्यासाठी चारपांच गोळ्या झाडल्या आणि सीताराम चांभार व धोंडी कुभार या दहा वारा वर्षांच्या दोन निरपराध वालकांचा वळी घेतला.

पोलिसांच्या लाठीमारात कोणाच्या पाठी सडकल्या, कोणाची मनगटे पिचली, कोणाची डोकी फुटली, कोणाच्या हातापायांची हाडे मोडली. या अमानुष पोलिसी लाठीमारांत सुमारे १ हजार माणसे घायाळ झाली. स्त्रियांचीही पोलिसांनी गय केली नाही.

## खानदेश

आणि तिकडे पश्चिम खानदेश (धुळे) जिल्ह्याकडे पाहा.

साक्री तालुक्यांतील दिवाळमाळ. हिरव्यागार गवताने झाकलेल्या त्या विशाल माळावर २५ हजार शेतकरी सामुदायिक सत्याग्रहासाठी जमला आहे. ऑगस्ट महिना. १७ तारीख. पावसाची रिपरिप. गुडघा गुडघा चिखल. तो तुडवित आसपासच्या ५–१५ खेड्यांतील शेकडों स्त्रिया व मुलेसुद्धा सत्याग्रहांत सामील होण्याकरिता आली आहेत. पश्चिम खानदशचे लोकप्रिय पुढारी व वकील धुळ्याचे आत्माराम कुलकर्णी आणि गांवोगावचे शेतकरी नेते आघाडीवर आहेत. त्यांनी बंद भागातील गवत कापले आणि त्याच्या मागून हजारों स्त्री-पुरुष उंच वाढलेल्या गवतांत घुसले आणि सपासप गवत कापून त्याच्या मोळ्या वांधू लागले.

ता. २७ ऑगस्टला धुळे तालुक्यातील लालिंग गावी तर कापडण्याचे प्रसिद्ध शेतकरी पुढारी दौलत पाटील व धुळ्याचे तरुण नेते यशवंत जावडेकर ३० हजार लोक घेऊन जंगलात घुसले.

तिसरा प्रचंड सत्याग्रह शहादे तालुक्यातील जयंतनगरचा. ता. ३१ ऑगस्ट. नेते होते, स्वातंत्र्यवादी श्रीमंत शेतकरी मंगेशराव पाटील. २५ हजार शेतकऱ्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली 'जंगल का कायदा तोड दिया.' त्यांत ८ हजार स्त्रिया होत्या. या प्रचंड सामुदायिक सत्याग्रहाचा परिणाम झाला असा की जंगलच्या जुलमी कायद्यांना शेतकरी विचारीनासा झाला.

सरकार दहशत वसवू लागले. धरपकड सुरू झाली. सजा होऊ लागल्या. आता सत्याग्रही नेत्यांनी सामुदायिक सत्याग्रहाऐवजी निवडक, कसलेल्या लोकांचा सत्याग्रह सुरू केला. शहादे, नंदुरवार व सिंदखेड तालुक्यांतील अनेक गावची जंगले या सत्याग्रहाने दणाणून सोडली.

जंगल सत्याग्रहाचा विलक्षण परिणाम झाला. कुरणाचे सरकारी लिलाव जवळपास बंद झाले. जेथे क्वचित होत तेथें सत्याग्रही निरोधन करून ते बंद पाडीत. शेतकऱ्यांनी वनचराई देणे अजिवात थांबविले. सरकार चिडले. वनचराई दिली नाही म्हणून शेतकऱ्यांवर खटले भरू लागले. तीन तीन महिन्यांच्या सक्त मजुरीच्या शिक्षा ठोठावल्या. गुरे कोंडवाड्यात घालण्याचा सपाटा सुरू केला. लोकांनीही कोंडवाडे उध्वस्त करण्याची मोहीम सुरू केली.

पश्चिम खानदेशमधील प्रभावी जंगल सत्याग्रहांमुळे पूर्व खानदेश (जळगांव) जिल्हाही पेटू लागला. तशी चिन्हे दिसू लागताच सरकारने आधीच दडपशाही सुरू केली. पुढाऱ्यांची व स्वयंसेवकांची धरपकड सुरू झाली. सत्याग्रही छावण्या उध्वस्त केल्या. पण नेते व कार्यकर्ते डगमगले नाहीत. त्यांनी जिल्ह्याच्या हद्दीवाहेर शिरपूरला व वऱ्हाणपूरला छावण्या काढल्या. तेथून

टोळ्याटोळ्यांनी सत्याग्रही मिरवणुकीने जवळच्या पूर्व खान-देशमधील जंगलात घुसायचे आणि गवत कापायचे.

खुद्द पूर्व खानदेशातील आसोदे (ता. जळगांव) आणि यावल, चाळीसगांव, भुसावळ, एदलाबाद, पाचोरे, चोपडे या तालुक्यांत अनेक गांवी जंगलात घुसून शेतकऱ्यांनी गवत कापले, अंजनीचा पाला तोडला, लांकडे कापली आणि हे सर्व उघडपणे बाजारांत विकून जगलचे अन्याय कायदे तोडले.

□ □

२०७८ १४/०१/८
विषय वाचा
BVBK-0402079